|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ३३ | सोमवार दि. १९ ऑगस्ट २०२४ ते रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड




## मुलीवर वाईट नजर ठेवण्याची चूक केली मुलाने बापाला मृत्युदंडाची शिक्षा दिली

टिटवाळा/क्राईम रिपोर्टर



**पुरुष हा तर कुटुंबाचा आधार असतो. त्याच बरोबर कुटुंबातील माय माऊलींच्या कुलशिलाच्या रक्षणाची जबाबदारी पुरुषावरच असते. पूर्वी पुरुष हा संस्कारक्षम असल्याने तसेच त्याच्यावर धर्म संस्कृतीचा पगडा असल्याने तो पाप पुण्याचा विचार करायचा परिणामी त्याच्या हातून सहसा कोणतेही अनैतिक कृत्य घडत नसे. मन आणि विचार शुद्ध असले कि माणसाच्या हातून काहीही चुकीचे घडत नाही. अशावेळी कुटुंबातील सर्व नातीगोती सुरक्षित असतात. चारभिंतीच्या आड राहणाऱ्या नात्यातील महिलांना भलेही उंबरठ्याची मर्यादा असली तरी त्या मर्यादेमुळे त्यांच्या चारित्र्याला कोणताही डाग लागत नव्हता. पण आता मात्र परीस्थिती बदलली आहे. पाश्चात्य संस्कृतीचा समाजावर प्रभाव पडू लागल्याने पुरुषाची मानसिकता बदलत चालली आहे. त्यातच चित्रपट आणि कथा कादंबऱ्या यांच्यातील अश्लीलता पुरुषाच्या मानसिकतेवर परिणाम करू लागलीय. त्यातून स्त्रीकडे बघण्याचा त्याचा दृष्टीकोन बदलू लागलाय. पूर्वी स्त्रीला मत भगिनीच्या रुपात बघणाऱ्या पुरुषाला आता मात्र समाजातील स्त्रीमध्ये केवळ एक मादी दिसू लागलीय. स्त्रीबद्दल असलेल्या आदरयुक्त भावनांची जागा आता वासनेने घेतली आहे. त्यामुळे पुरुषाच्या याच बदललेल्या मानसिकतेचा कुटुंबातील स्त्रीयानंही त्रास होऊ लागलाय. पूर्वी कुटुंबातील पुरुषाच्या नजरेत धाक होता, आता वासना दिसत असल्याने नाती गोती संकटात आलीय. परिणामी घरातल्या पुरुषापासुंनच कुटुंबातील महिलांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. कुटुंबात संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. आणि हा संशय एखाद्याच्या प्राणावर बेतू लागलाय. टिटवाळा येथील अशाच एका घटनेत एका इसमाची त्याच्या सावत्र मुलीवर वाईट नजर होती. मात्र याबाबतचा संशय मुलाला येताच त्या मुलाने आपल्या सावत्र बापाची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**





मुंबईपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या टिटावळा जवळील गावात एक धक्कादायक प्रकार घडला आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. तेथे एक मुलाने त्याच्या सावत्र वडिलांचीच निर्घृणपणे हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. वडिलांची आपल्या बहिणीवर वाईट नजर होती, असा संशय आल्यानेच मुलाने हे धक्कादायक पाऊल उचलल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणाचा तपास सुरू करून टिटवाळा पोलिसांनी अवघ्या १२ तासांत गुन्ह्याचा उलगडा केला. आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या असून, पुढील कारवाई सुरू आहे. कल्याण टिटवाळा परिसरातील बल्याणी गावात ही हत्या घडली. हार्डवेअरच्या दुकानात काम करणारे कदीर सिद्दीकी यांची त्यांच्या सावत्र मुलानेच निर्घृणपणे हत्या केली. कदीर सिद्दीकी, हे आपल्या कुटुंबासोबत टिटवाळा परिसरात राहत होतो. त्यांनी काही वर्षापूर्वी त्यांच्यापेक्षा ...पान २ वर

## काकूचे मन सुडाने पेटले पुतण्याला विहिरीत फेकले

छत्रपती संभाजी नगर/क्राईम रिपोर्टर

**आजकाल माणूस इतका स्वार्थी आणि खुनशी झाला आहे कि त्याला नात्या-गोत्याचाही विसर पडत चालला आहे. दुर्दैवाने यात महिलाही मागे राहिलेल्या नाहीत. संभाजी नगर जिल्ह्यातील माटेगाव येथे एका महिलेच्या मुलाच्या डोळ्यात तिच्या दिराच्या मुलाने चुना फेकला होता. त्यामुळे त्याला अंधत्व आले. या गोष्टीचा त्या महिलेच्या मनात अगोदरच राग होता, त्यातच तिच्या दिराच्या पत्नीने गर्भाशय काढून टाकल्याने तिला भविष्यात मुल होणार नव्हते. त्यामुळे तिच्या मुलाला ठार मारले, तर बदलाही पूर्ण होईल आणि दिराची ६ एकर शेती आपल्याला मिळेल या भावनेतून एका महिलेने आपल्या लहान पुतण्याला विहिरीत फेकून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली आहे.**



गेल्या आठवड्यात चार वर्षीय सार्थक सागर जाधव या बालकाचा मृतदेह विहिरीत संशयितरीत्या आढळला होता. तो खेळताना विहिरीत पडला असावा, असा कयास बांधला जात होता. मात्र, सदरील बालकाचा त्याच्या सख्ख्या काकूनेच बदला व संपत्तीच्या हव्यासापोटी विहिरीत ढकलून खून केल्याचे पोलिस तपासात सोमवारी उघड झाले आहे. या घटनेमुळे कन्नड तालुक्यात खळबळ उडाली आहे. सुनीता गणेश जाधव असे क्रूरकर्मा काकूचे नाव आहे. माटेगाव येथील गट नं. १७ मधील शेतवस्तीवर गणेश हिरामण जाधव व सागर हिरामण जाधव हे दोघे भाऊ एकत्र राहतात. या दोघांना वडिलोपार्जित सहा एकर शेती आहे. मोठा भाऊ गणेश याच्या पत्नीचे नाव सुनीता असून, त्यांना दोन मुले आहेत. तर लहान भाऊ भाऊ सागर यास एक मुलगी व मुलगा सार्थक होता. काही दिवसांपूर्वी सागर यांचा मुलगा सार्थकने खेळताना गणेश यांच्या मुलाच्या डोळ्यात चुना टाकला. यामुळे त्याचा एक डोळा पूर्णपणे निकामी झाला. या घटनेपासून सुनीताच्या मनात चार वर्षीय सार्थकबद्दल प्रचंड राग होता. दरम्यान, काही दिवसांपूर्वी सागर यांच्या पत्नीचे ऑपरेशन करून गर्भपिशवी काढून टाकण्यात आली. भविष्यात तिला मूलबाळ होणार नाही, याची जाणीव सुनीताला झाली होती. त्यामुळे सार्थकला संपविले, तर बदलाही पूर्ण होईल व सर्व शेती आपल्या मुलांना मिळेल. असा विचार सुनीताच्या डोक्यात आला. तेव्हापासून ती संधी शोधत होती. ३१ जुलै रोजी दुपारी अकरा वाजेच्या सुमारास सागर व त्यांची पत्नी दोघे शेतात गेले होते. तर त्यांची मुलगी शाळेत गेली होती. सार्थक घरात एकटाच होता. ही संधी साधून सुनीताने चिमुकल्या सार्थकला उचलून नेत घरापासून काही अंतरावर असलेल्या विहिरीत फेकून दिले. ...पान २ वर

## अनैतिक संबंधामुळे पत्नीचा तोल गेला प्रियकराच्या मदतीने पतीचा गेम केला

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर

**पती-पत्नीच्या सुखी संसारात जेंव्हा तिसऱ्याची एन्ट्री होते तेंव्हा संसारात कलह निर्माण होतो. अशावेळी त्या बाईला तो परपुरुष जास्त आवडू लागतो, पण त्यांच्या अनैतिक संबंधात पतीचा अडसर असतो. त्यामुळे मग प्रियकराच्या मदतीने पतीला मार्गातून हटवले जाते. जयश्री आणि प्रभाकर यांच्या बाबतीत असेच झाले. जयश्रीच्या माहेरचा सुरज त्यांच्या घरी येऊ लागला. दोघांच्यात अनैतिक संबंध सुरु झाले. प्रभाकरने या अनैतिक संबंधाला विरोध करताच दोघांनी मिळून प्रभाकरची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी जयश्री व सुरजला अटक केली आहे.**

प्रभाकर कवडुजी मारवाडी हा इसम घाटंजी तालुक्यातील राजुरवाडी येथे आपली पत्नी जयश्री आणि दोन मुलासह राहयला आहे. प्रभाकर हा मोलमजुरी करून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता. तशी त्याच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच होती. कुंटूंबाचा रहाट गाडा चालविताना त्याची दमछाक होत होती. त्यातूनच त्याची जयश्रीबरोबरच रोज भांडणे होऊ लागली. दोन मुलांना घास भरवताना ही अवघड होऊ लागले. त्यातच जयश्री ही वारंवार त्याच्याबरोबर भांडण करून आपल्या माहेर वर्धा येथे जात होती. लग्नानंतर सारखी भांडणे करून आपल्या माहेर निघून जाणे हे बरे नाही असे प्रभाकर हा जयश्रीला सांगत होता. तरीही ती ...पान २ वर

## पती व पत्नीचे नाते अल्पजीवी ठरले अपंग पतीला विहरीत ढकलून मारले



जळगाव (धरणगाव)/क्राईम रिपोर्टर

**भवरखेडा येथे राहणारा प्रकाश अपंग होता. तरीही घरच्यांनी त्याचे लग्न लावले. पण पत्नीला मात्र अपंग पती पसंत नव्हता. त्यामुळे दोघांच्यात भांडणे होऊ लागली. अखेर या भांडणाला कंटाळून पत्नीने प्रकाशला कायमचे संपवण्याचा निर्णय घेतला आणि एके दिवशी गावातल्या देवाच्या दर्शनाला जायचे निमित करून त्यला घराबाहेर आणून मंदिरा जवळच्या शेतातल्या विहिरीत प्रकाशला ढकलले व त्याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे.**











प्रकाश यादव धोबी हा तरुण जळगाव जिल्ह्याच्या धरणगाव तालुक्यातील भवरखेडा या गावी रहात होता. प्रकाश हा दोन्ही पायाने अपंग होता. लहानपासूनच दोन्ही मांड्या कमकुवत असलेल्या प्रकाशला अपंगत्व आले होते. उभे राहण्यासह चालतांना त्याला अडचणी येत होत्या. त्यामुळे तिनचाकी सायकलवरच त्याला कुठेही ये जा करावी लागत होती. अपंगत्वावर मात करण्यासाठी प्रकाशच्या वडीलांनी त्याला गावातच एक लहानशी पान टपरी सुरु करून दिली होती. पान टपरीतून तो त्याचे अर्थार्जन करत होता. अपंगत्व असले तरी प्रकाश आता स्वावलंबी झाला होता. अर्थार्जनासाठी आणि कुठेही ये जा करण्यासाठी त्याला कुणावर अवलंबून रहावे लागत नव्हते. कमावत्या प्रकाशचा विवाह जामनेर तालुक्याच्या वाकोद येथील ज्योती नावाच्या तरुणीसोबत झाला. लग्नानंतर ज्योती तिच्या सासरी अर्थात पती प्रकाशकडे धरणगाव तालुक्यातील ...पान २ वर

## दोघांमध्ये रिक्षाच्या भाड्याचा वाद पेटला ३० रुपयांसाठी त्याने मित्राचा जीव घेतला

कुर्ला/क्राईम रिपोर्टर

**पैशाचा लोभ माणसाला दोस्ती यारी नाती गोती आणि माणुसकी विसरायला लावतो. एकाच गावात राहणारे दोन मित्र मुंबईत पोट भरायला आले. दोघांनाही पैसे कमवायचे होते. त्यामुळे ते पै पैशांचा हिशोब ठेवत होते. पैशांच्या बाबतीत एकमेकांशी फारशी आर्थिक देवाण घेवाण ठेवत नव्हते. पण त्यांच्यातील हाच कंजूसपणा एकाच्या जीवावर बेतला. रिक्षाचे ३० रुपये भाडे तू द्यायचे कि मी द्यायचे यावरून झालेल्या वादात अवघ्या ३० रुपयांसाठी जाहीद त्याचा मित्र चक्कन याला रिक्षातून ढकलले, त्यात चक्कनच्या डोक्याला गंभीर जखामांनी त्यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी जाहीदला अटक केली आहे.**

मुंबई शहरात गुन्हेगारीचं प्रमाण प्रचंड वाढलं असून छोट्या-मोठ्या कारणासाठी लोक एकमेकांचा जीव घ्यायलाही पुढेमागे बघत नाहीत. गेल्या आठवड्यात दर स्टेशनवर एका सूटकेसमध्ये मृतदेह सापडल्याने खळबळ माजली होती. मूकबधिर मित्रांनीच त्यांच्या एका मित्राचा खून केला होता. आता मुंबईत तशीच आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. अवघ्या ३० रुपयांसाठी एका इसमाला त्याचा अमूल्य जीव गमवावा लागला आहे. हो , हे खरं आहे. रिक्षाचं भाडं देण्यावरून मित्रांमध्ये वाद झाला आणि एक मित्रच दुसऱ्या मित्राच्या जीवावर उठला. त्याने मित्राला जबर मारहाण केली आणि त्याला तसाच जखमी अवस्थेत मरायला टाकून ...पान २ वर

## लग्नाच्या दिवशीच शोकांतिका झाली पतीने पत्नीला मारून आत्महत्या केली

कर्नाटक (कोलार)/क्राईम रिपोर्टर



**माणसाचा स्वभाव रागीट नसावा जरी त्याला राग आला तरी त्याला रागावर नियंत्रण ठेवता यायला हवे. कारण रागाच्या भरात माणसाच्या हातून काहीही घडू शकते. ज्यांचे एकमेकांवर निस्सीम प्रेम आहे असे प्रेमी युगल लग्नाच्या बंधनात अडकल्यावर काही तासातच त्यांचा शेवट होईल यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही, पण कर्नाटकातील कोलार जिल्ह्याच्या चम्बारासहल्ली गावात अशाच एका घटनेत लग्न होऊन काही तास उलटले नाही तोच नवविवाहित जोडप्यात काही कारणावरून झालेल्या शुल्लक वादात पतीने कुऱ्हाडीचे घाव घालून तिची हत्या केली व स्वतःही आत्महत्या केली. या घटनेमुळे लग्नासाठी आलेल्या आप्त इष्टामध्ये मोठी खळबळ माजली. या प्रकरणी पोलीस अधिक चौकशी करीत आहेत.**

कर्नाटकातील कोलार जिल्हा हा समृद्ध जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयाला कर्नाटकातील सोन्याची खाण म्हणून ओळखले जाते. या सोन्याच्या खाणीतील भ्रष्टाचारावरूनच कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री युडियुराप्पा यांना घेरले होते. त्यावेळी राजकीय कारर्किद बरीच गाजली होती. कोलार येथील गोल्ड फिल्ड्स चम्बंरासहल्ली येथील नवीन याचे लिखिता हिच्याबरोबर गेल्या दोन वर्षापासून प्रेमप्रकरण चालू होते. लिखिता ही सध्या बंगळुरू येथील फ्री युनिर्व्हिसिटीमध्ये मेडिकलचे शिक्षण घेत असल्याने तिचे करियर करण्याकडे लक्ष होते तरीही नवीन तिला सारखे भेटायला येत असल्याने ती त्याला ती वेळ देत होती. दोघांच्या ही घरच्यांना त्याचे प्रेमप्रकरण माहिती असल्याने दोघांच्या ही घरच्यांनी त्यांना लग्न करणास मान्यता दिलेली होती. ...पान २ वर

## सत्य लपवण्याची अंगाशी आली खेळी आईवरच्या रागात गेला मुलाचा बळी

ठाणे/क्राईम रिपोर्टर

**खोटे बोलणे कधी कधी खूप महागात पडते. रेश्मा नावाच्या महिलेने दुसरे लग्न केले होते. मात्र पहिल्या पतीपासून तिला एक मुलगा असल्याचे तिने दुसऱ्या पतीला सांगितले नव्हते. पण नंतर ती आपल्या ४ वर्षाच्या मुलाला घेऊन आली. या गोष्टीचा तिच्या दुसऱ्या पतीला म्हणजेच दिलशानला इतका राग आला कि त्याने रेश्मावरचा राग तिच्या लहान मुलावर काढला आणि त्याची गळा आवळून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी दिलशानला अटक केली आहे.**

काही घटना या सुन्न करणाऱ्या असतात. अशा घटनांवर कसं व्यक्त व्हावं? किंवा संबंधित घटना कशी मांडावी? असा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न निर्माण होण्यामागील कारणही अगदी तसंच आहे. एका सावत्र बापाने ४ वर्षाच्या चिमुकल्याचा खून केला आहे. संबंधित घटना ही ठाण्यात चितळसर मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत घोडबंदर रोड परिसरात घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सावत्र बाप जरी असला तरी आरोपीला मानवता हा धर्म नव्हता का? असा प्रश्न उपस्थित होतोय. संबंधित घटनेमुळे ठाणे शहर हादरलं आहे. घटना समजल्यानंतर अनेक जण सुन्न झाले आहेत. पोलिसांनी आरोपी सावत्र बापाला अटक केली आहे. पण या घटनेत ४ वर्षाच्या निष्पाप चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. त्याची काहीही चूक नसताना त्याच्या सावत्र पित्याने त्याची ...पान ६ वर

## शुल्लक कारणावरून चिडला फार भावाने केले सख्ख्या बहिणीला ठार

मुंबई/एस.कुमार



**आजकाल माणूस इतका शीघ्रकोपी झालाय कि छोट्या छोट्या गोष्टीचा त्याला राग येतो. त्यामुळे एकदा का त्याचा संताप अनावर झाला कि मग तो नात्यागोत्याचा सुद्धा विचार करीत नाही. बोरिवलीतील गणपत पाटील नगरात अशाच एका घटनेत शुल्लक कारणावरून झालेल्या वादात भावाने बहिणीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी भावाला अटक केली आहे.**

अवधेश कुमार फुलुराम यादव रा. गणपत पाटील नगर, न्यू लिंक रोड बोरवली (पश्चिम) याने बोरीवली येथील एमएचबी कॉलनी, पोलीस ठाण्यात येऊन सांगितले की,राजीव साह (वय २३) याने त्यांची बहीण चुनियादेवी राम विश्वास यादव (वय ३२) रा. गल्ली नंबर ४, गणपत पाटील नगर, न्यू लिंक रोड बोरवली पश्चिम मुंबई हिच्याशी कोणत्यातरी कारणावरून वाद घालून शिवीगाळ करून हाताने मारहाण करून जखमी केले आहे. ही माहिती मिळताच एमएचबी कॉलनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर कुडाळकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सचिन शिंदे, पोलीस निरीक्षक किरण सुरसे, यांनी ताबडतोब घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी भेट दिल्यानंतर चुनियादेवी हिच्या शरीरावर कोणत्यातरी धारदार हत्याराने डोक्यावर व इतर भागांवर जखमा केल्याचे आढळून आले. तसेच जवळच शिजत असलेल्या पातेल्यातील गरम गरम भात हातावर टाकून दोन्ही हातांच्या मनगटावर भाजण्यास कारणीभूत ठरुन गंभीर दुखापत केल्याचे दिसून आले. पोलिसांनी तातडीने गंभीर जखमी झालेल्या चुनियादेवी हिला पुढील उपचारासाठी परळ येथील केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना २ आगस्ट रोजी सदर महिला मयत झाल्याचे डॉक्टरांनी तपासून घोषित केले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदना ...पान ६ वर

19 TO 25 AUGUST 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 8/17/2024 8:03 PM Page 1



पान १ वरून...

## मुलीवर वाईट नजर ठेवण्याची चूक ...

वयाने मोठी असलेल्या महिलेशी लग्न केले होते. त्या महिलेला पहिल्या पतीपासून कबीर सिद्दीकी हा एक मुलगा आणि मुलगी अशी दोन अपत्यं होती. मात्र रविवारी रात्री कदीर सिद्दीकी यांची हत्या करण्यात आली, ज्यामुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं. या प्रकरणाचा तपास सुरू करून टिटवाळा पोलिसांनी अवघ्या १२ तासांत गुन्ह्याचा उलगडा केला. कदीर सिद्दीकी यांचा सावत्र मुलगा, कबीर सिद्दीकी, आणि त्याचा मित्र अल्ताफ शेख यांना पोलिसांनी अटक केली आहे. आपल्या वडीलांची (कदीर सिद्दीकी) हे आपल्या बहिणीवर वाईट नजर आहे, असा संशय कबीर सिद्दीकी याला होता. त्या संशयातूनच त्याने आपल्या मित्राच्या मदतीने सावत्र वडिलांची धारधार शस्त्राने हत्या केली. टिटवाळा पोलिसांनी आरोपींची कबुली घेतली असून, पुढील तपास सुरू आहे. या घटनेने बल्याणी गावात आणि टिटवाळा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## काकूचे मन सुडाने पेटले...

यातच बुडून सार्थकचा मृत्यू झाला. दुसऱ्या दिवशी सापडला मृतदेहसार्थकला विहिरीत फेकून दिल्यानंतर काही झालेच नाही, असे दाखवून सुनीता घरी आली. काही वेळाने सागर जाधव घरी आले, तेव्हा त्यांना सार्थक घरात दिसला नाही. सर्व कुटुंबीय त्याला शोधण्याच्या कामाला लागले. तेव्हा सुनीताही त्याला शोधत होती. शेवटी देवगाव रंगारी पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली. दुसऱ्या दिवशी १ ऑगस्ट रोजी सार्थकचा मृतदेह विहिरीत आढळला. तपासादरम्यान सुनीतावर संशयसार्थकचा मृतदेह आढळल्यानंतर पोलिसांनी त्याचा घातपात झाल्याच्या संशयावरून तपास सुरू केला. तेव्हा सार्थकची काकू सुनीता गणेश जाधवचे वागणे संशयास्पद असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. यामुळे पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन चौकशी केली. सुरुवातीला तिने मला काही माहीत नसल्याचे सांगितले. मात्र पोलिसांनी खाक्या दाखविताच तिने हे कृत्य केल्याचे कबूल केले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सपोनि. संदिप राजपूत करीत आहेत.

## अनैतिक संबंधामुळे पत्नीचा तोल गेला...

त्याचा विरोध मोडून आपल्या माहेरी जात येत होती. त्याच्या लग्नाला नऊ ते दहा वर्ष झाली. सुरूवातीला त्या दोघांचा संसार तसा सुरळीत आणि आनंदात चालला. परंतु अलिकडे जयश्रीच्या वागण्या बोलण्यात आणि रहाणी मानात फरक पडल्याचे त्याला दिसून येऊ लागले. त्याचवेळी तो घरात नसताना जयश्रीच्या माहेर कडचा सुरज रोहनकर हा तरूण त्याच्या घरी सारखा येत जात होता. वयाच्या २८ ते २०शीतील सुरज हा देखणा होता. सुरज हा घरी आला की, जयश्रीची मुले त्याला मामा मामा म्हणत होती. तर जयश्रीने नवऱ्याला सुरजची ओळख ही आपला माहेरकडील भाऊ असल्याची करून दिली. त्यामुळे प्रभाकर याला सुरजचे घरी येणे जाणे खटकत नव्हते. दिवस असेच जात होते. अलिकडे तर सुरजचे जयश्रीच्या घरी येणे जाणे सारखे वाढले होते. प्रभाकर हा घरी नसताना सुरज हा घरी आला की त्याच्या घराचा दरवाजा बंद होत होता.या बंद दरवाज्या आड काय शिजत आहे, काय चालले आहे हे शेजाऱ्यांना समजत होते. त्यातून सुरजच्या आणि जयश्रीच्या त्या संबंधाची चर्चा प्रभाकर राहत असलेल्या गल्लीत सुरू झाली. आपली बायको बाहेरख्याली बनून आपल्यालाच उल्लू बनवत आहे याची त्याला भयंकर चिड येऊ लागली. प्रियकरालाच भाऊ असल्याचे नवऱ्याला सांगून जयश्रीने नवरा प्रभाकर याला मुर्खात काढल्याचे शेजारील लोक आपसात चर्चा करीत होते. ती सुरजच्या प्रेमात इतकी वाहवत गेली की, ती नवऱ्याला आणि शेजारील लोकांना किमंतच देत नव्हती. बायकोच्या अशा वागण्याने प्रभाकर हा वैतागलेला होता. तो कामावरून घराकडे येताना दारू पिऊनच घरी येऊ लागला.तो दारू पिऊन आला की नवरा बायकोची भांडणे ठरलेली असायची. या भांडणात प्रभाकर हा सुरजचा विषय काढायचा. तो तुझा ठेवलेला गडी आहे का? असे तो म्हणायचा. भांडणात तो तिला मारहाण करू लागला की, ती ही त्याच्यावर तोंड सुख घ्यायची. त्यामुळे ती त्याच्या बरोबर भांडण करून सारखी तिच्या माहेरी जाऊ लागली. माहेरी जाऊन ती प्रियकर सुरज बरोबर गुलछर्रे उडवत होती. तिच्या माहेरच्या लोकांनी ही तिला तिच्या अशा वागण्यावरून चांगलेच खडसावले होते.परंतु ती ऐकणाऱ्यातील बाई नव्हती. उलट ती नवरा माझा असा करतो तसा करतो म्हणून माहेरच्यांना सांगून त्याच्या विषयी विष कालवित होती.आता कसेपण नवऱ्याला आपल्या संबंधाबद्दल माहित झाले असल्याने ती सुरजला उघड उघडच आपल्या घरी नवऱ्यासमोर बोलावून घेत होती. प्रभाकर हा काही बोलला की ते दोघे त्यालाच उलट शिवी गाळ करून घराबाहेर हाकलत होता. प्रभाकरच्या तर डोक्यावरून आता पाणी गेले होते. तो हतबल झाला होता. त्याला काय करावे आणि काय नको असे झाले होते. आपल्या दोन्ही मुलाकडे बघून तो गप्प होता. नवरा बाहेर आणि प्रियकर आत घरात मजा करत होता. एकंदरीत तिने त्याला विचारात घेतले नव्हते. तरी ही प्रभाकर हा दारू पिऊन आला की, त्याच्या संबंधाला विरोध करीत होता. बऱ्याचवेळेला जयश्री ही नवऱ्याच्या समोरच प्रियकराला घेऊन झोपत होती. सुरज गेला की प्रभाकर हा जयश्रीला मारबडव करीत तिला नको नको ते बोलत घरातून बाहेर निघून जाण्यास सांगत होता. तुझ्यामुळे माझी इज्जत अब्रु गेली आहे असे म्हणून तो तिला घरातून हाकलून देण्याचा प्रयत्न करीत होता. भांडणात जयश्री ही त्याच्यावर तोंडसुख घेत तु आता म्हातारा झाला आहेस तुझ्या हातून काही होत नाही म्हणून मी माझ्या प्रियकराला माझ्या अंगावर खेळविते असे म्हणून त्याचा पाणउतारा करीत होती. जयश्रीला आता नवरा नकोच होता. ती तरण्याबांड सुरजलाच नवरा मानत होती. तो ही तिच्यासाठी काय वाटेल ते करायला तयार होता. म्हणून तिने त्याला स्पष्टच सांगून टाकले की मी जर तुला पाहिजे असेल तर आपल्या संबंधात अडथळा ठरणाऱ्या माझ्या नवऱ्याला बाजुला कर. तिने सुरजला तसे सांगितल्याने तो ही ती सांगेल तसे करायला तयार असल्यानेच त्या दोघांनी प्रभाकरची गेम करायची आणि त्याचा खून करून त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याचा त्यांनी या पध्दतशीर प्लॅन केला. शुक्रवार दि.२६ जुलै २०२४ रोजी तिने वर्ध्याहून सुरज रोहनकर याला राजुरवाडी येथे बोलावून घेतले. नेहमीप्रमाणे तो संध्याकाळी तिच्या घरी मुक्कामालाच आला. रात्री प्रभाकर हा दारू पिऊन घरी आल्यावर सुरजला आपल्या घरी बघितल्यावर त्याच्या तळ पायाची आग मस्तकात गेली. या कारणातून नवरा बायकोची जोरात भांडणे झाली.तो तिला मारहाण करीत असताना सुरजने प्रभाकरला आडवून त्याला बाजुला ढकलले आणि घरातून बाहेर जाण्यास सांगितले. प्रभाकर हा वैतागून बाहेर गेला परत तासाने तो फुल्ल दारू पिऊन घरी आला. त्यावेळी त्याची दोन्ही मुले आतील खोलीत झोपली होती. तर जयश्री आणि सुरज एका खोलीत झोपले होते. आता काय चालले आहे हे प्रभाकर समजुन गेला स्वत:च्या नशिबाला दोष देत तो बाहेरच्या खोलीत झोपला. पहाटेच्या दरम्यान तो झोपेत असताना त्याचे हात पाय कुणी तरी दाबुन धरल्याचे त्याला जाणविले. तो उठण्याचा प्रयत्न करीत असताना रात्रीच्या अंधारात कुणी तरी त्याचा जोरात गळा दाबत होता.तो सुरजच असल्याचे त्याने ओळखले. तो त्याला झिडकारत बाजुला करीत ओरडण्याचा प्रयत्न करीत असताना आतील खोलीत त्याची झोपलेली दोन्ही मुले जागी झाली. समोरचा प्रसंग बघून त्याची थरकाप उडाली. त्याच्या तोंडून आवाज ही निघत नव्हता. त्याची आई त्याच्या वडिलांचे तोंड दाबत होती तर मामा म्हणारा सुरज हा वडिलाचा गळा दाबत होता. त्या दोघांनी प्रभाकरला असे घट्ट आणि ताकद धरून ठेवले की, त्याला काहीच हालचाल करता आली नाही. काही क्षणातच त्याचा श्वासो श्वास गुदमुरून त्याची हालचाल बंद झाली. आपल्या नवऱ्याची गेम केल्यानंतर तिने प्रियकर सुरजला त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यास सांगितले. त्याचा खून नसून त्याचा अपघात झाल्याचे त्यांना दाखवायचे असल्याने त्या दोघांनी त्याचा मृतदेह एका पोत्यात कोंबला.ते पोते सुरजने पहाट होण्याआधी आपल्या दुचाकी गाडीला बांधून गावाबाहेर असणाऱ्या रस्त्याकडेला नेवून टाकले. परत येताना ते पोते त्याने घेऊन आला. रस्त्याच्या कडेला त्याचा मृतदेह टाकताना त्याने काळजी अशी घेतली की प्रभाकर हा रस्त्यावरून दारू पिऊन येत असताना त्याला कुठल्या तरी गाडीने धक्का मारल्याने तो बाजुला तोल जाऊन पडला आणि त्याचा मृत्यू झाला. सकाळी गावातील लोकांना गावाबाहेरच्या रस्त्यावर प्रभाकर मारवाडी याचा मृतदेह पडला असल्याचे दिसून आले.कुणी तरी या घटनेची माहिती घाटंजी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्रभाकर याचा अपघाती मृत्यू झाल्याचा संशय आला. घटनास्थळी त्याच्या पत्नीने तसा जबाब प्रभाकरच्या पत्नीने पोलीसांना दिला. पोलीसांनी मयताचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी घाटंजी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. दुसऱ्या दिवशी उतरीय तपासणीचा रिर्पोट पोलीसांना मिळाला. त्यामध्ये मयताचा मृत्यु श्वास कोंडल्याने आणि गळा आवळून असा उल्लेख होता. यावरून पोलीसांनी खूनाचा संशय व्यक्त करून तपासाला सुरवात केली. घटनास्थळी पोलीस अधिक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांनी भेट देऊन या घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना शेजारील लोकाकडे मयताची माहिती घेतली असता त्यांना मयत प्रभाकर मारवाडी याची पत्नी जयश्री हिचे तिच्या माहेर कडील सुरज रोहनकर याच्याबरोबर विवाहबाहय अनैतिक संबंध असल्याची माहिती मिळाली. यावरून पोलीसांनी तिला ताब्यात घेऊन तिच्याकडे या घटनेची चौकशी केली असता ती पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होती. तिला महिला पोलीसाकरवी पोलीसी खाक्या दाखविताच तिने आपला गुन्हा कबुल करीत आपल्या आणि सुरज रोहनकर याच्या संबंधात पती प्रभाकर मारवाडी याचा अडसर ठरत असल्याने आम्ही दोघांनी मिळून प्रभाकर याचे तोंड आणि गळा दाबून त्याचा खून करून त्याचा मृत्यू हा अपघाती बनाव असल्याचे नाटक केल्याचे तिने सांगितले. तिने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेनंतर पळून गेलेला तिचा प्रियकर सुरज रोहनकर याला वर्ध्यातून ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना पोलीसांनी मयत प्रभाकर याच्या दोन्ही लहान मुलांकडे चौकशी केली असता त्यांनी ही घडलेला प्रसंग रडत रडत पोलीसांना सांगितला. या घटनेची लेखी फिर्याद मयत प्रभाकर मारवाडी याच्या नातेवाईकाडून घेऊन पोलीसांनी घाटंजी पोलीस ठाण्या प्रभाकर कवडुजी मारवाडी (वय ४०) याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रसंगी त्याची पत्नी जयश्री प्रभाकर मारवाडी (वय २८) आणि तिचा प्रियकर सुरज रोहनकर (वय २८) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३,(१) प्रमाणेग गुन्हा दाखल करून त्यांना न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने या दोघांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी सुरज कडून गुन्हयात वापरेली मोटार सायकल जप्त केले. या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर, पोलीस उप निरीक्षक शशिकांत नागरगोजे, निलेश कुंभेकर, संदीप गोहणे यांनी केला. त्या संबंधात विवाहीता भरकटली की, ती कोणत्या थराला जाते हेच या घटनेवरून दिसून येते.

## पती व पत्नीचे नाते अल्पजीवी ठरले...

भवरखेडा या गावी राहण्यास आली. नारळ चांगले आहे की खराब हे फोडल्यानंतरच समजते. अगदी तशीच गत विवाहानंतर प्रकाशची झाली. पत्नी ज्योतीचे चालचलन व्यवस्थित नसल्याचे विवाहानंतर त्याच्या लक्षात आले. पत्नी ज्योतीचे चालचलन व्यवस्थीत नसल्याचे समजल्यानंतर प्रकाश व्यथीत झाला. अवघड जागेवरचे दुखणे त्याला दिवसेंदिवस व्यथीत करत होते. प्रकाशच्या अपंगत्वाचा फायदा घेत त्याची पत्नी ज्योती कधी कधी त्याला मारहाण देखील करत होती. तुझ्यामुळे माझ्यावर बंधने आली असून मला मनासारखे वागता येत नाही, तुझ्यामुळे मला आडकाठी होते असे देखील ती त्याला बोलत होती. तिच्या अशा वागण्या - बोलण्यामुळे प्रकाशला जीवंतपणी मरणयातना भोगाव्या लागत होत्या. आपली व्यथा त्याने घरात आई वडीलांसह निवडक नातेवाईकांच्या कानावर टाकली. सर्वांनी मिळून ज्योतीला समजावले. तिने देखील तेवढ्यापुरते हो म्हटले. मात्र तिच्या वागण्यात आणि बोलण्यात काही फरक पडला नाही. मनातल्या मनात प्रकाशची घुसमट सुरुच होती. त्यामुळेदोघांमधे वादाची ठिणगी पडत होती. त्यामुळे कधी कधी त्याचे कामात लक्ष लागत नव्हते. १ जून २०२४ ही प्रकाशच्या जीवनातील अखेरची रात्र आणि २ जून २०२४ हा दिवस प्रकाशच्या जीवनातील अखेरचा दिवस ठरला. पत्नीच्याच हातून आपले मरण निश्चीतच असल्याचे त्याला समजले नाही. मनुष्य हा नियतीच्या हातातील एक खेळणे आहे. ज्या दिवशी, ज्या ठिकाणी,ज्या क्षणाला मनुष्याचे मरण लिहीलेले असते त्या दिवशी, त्या ठिकाणी, त्या वेळी मनुष्याचे पाय आपोआप वळतात. प्रकाशच्या बाबतीत देखील असेच झाले. अपंग पतीला कायमचे संपवण्याचा ज्योतीने मनाशी निर्णय घेतला होता. मुंजोबाच्या मंदीरावर पाया पडण्याच्या बहाण्याने जोडीने जायचे आणि तेथेच संधी साधून प्रकाशला कायमचे संपवण्याचा तिने मनाशी निर्णय घेतला होता. २ जून २०२४ रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास प्रकाश व त्याची पत्नी ज्योती असे दोघे जण गावातील शालिक पाटील यांच्या शेतातील मुंजोबाच्या मंदीरावर पाया पडण्यासाठी निघाले. वाटेत ग्रामपंचायतीजवळ त्याला काका अर्जुन धोबी भेटले. आपण ज्योतीसह मुंजोबाच्या मंदीरावर पाया पडण्यासाठी जात असल्याचे त्याने काका अर्जुन धोबी यांना सांगितले. त्यानंतर दुपारी दोन वाजेच्या सुमारास मुंजोबाच्या मंदीराजवळ ज्योती आणि प्रकाश हे दोघे जण सोबत बसले. त्यावेळी दोघांमधे काहीतरी शाब्दिक वाद सुरु असल्याचे अधिकार एकनाथ पाटील या तरुणाने शेतातून घरी परत येतांना पाहिले. चालचलन व्यवस्थित नसल्याच्या कारणावरुन प्रकाशने तिच्यासोबत मंदीर परिसरात वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद वाढतच गेला. दरम्यान शेतातील विहीरीकडे तोंड करुन उभ्या असलेल्या अपंग प्रकाशला धडधाकट ज्योतीने विहीरीत ढकलून दिले. सुमारे पन्नास फुट खोल विहीरीत भरपूर पाणी असल्यामुळे अपंग प्रकाशने जीव वाचवण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. मात्र त्याच्या अपंगत्वाचा आणि हतबलतेचा ज्योतीने पुरेपुर गैरफायदा घेतला. त्याला तशाच अवस्थेत सोडून ती एकटीच घरी निघून आली. विहीरीला भरपूर पाणी असल्यामुळे प्रकाशचा पाण्यात बुडून मृत्यु झाला. शेतातील मंदीरात जातांना दोघे सोबत गेले मात्र दुपारच्या वेळी ज्योती एकटीच परत आली. त्यावेळी गावाच्या बाहेर असलेल्या पाण्याच्या हाळीवर शैलेंद्र पाटील हा तरुण गायींना पाणी पाजण्याचे काम करत होता. तुमचे भाऊ प्रकाश दिसले का? अजून घरी आले नाही असे तिने शैलेंद्र पाटील या तरुणास मुद्दाम विचारले. आपल्याला प्रकाशच्या बाबतीत काहीच माहिती नाही असा तिने आव आणण्यास सुरुवात केली. ज्योती एकटीच घरी आली आणि तिने तिचा दिर दिपक यास म्हटले की तुमचे भाऊ बराच वेळ झाला तरी घरी आले नाही. तुम्ही त्यांचा शोध घ्या. बराच वेळ झाला तरी प्रकाश परत आला नाही. त्यामुळे दुपारी तिन वाजेच्या सुमारास प्रकाशचा लहान भाऊ दिपक याने त्याला मोबाईल कॉल केला. मात्र पलीकडून प्रकाशचा फोन लागत नव्हता. एवढा वेळ झाला तरी प्रकाश घरी आला नाही, त्याचा मोबाईल देखील लागत नाही म्हणून घरातील सदस्य देखील हवालदिल झाले. अखेर प्रकाशचा लहान भाऊ दिपकने त्याचे काका अर्जुन धोबी यांच्या कानावर हा प्रकार टाकला. त्यामुळे दिपक, त्याचे काका अर्जुन आणि गावातील तरुण मंडळी आदींनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. बस स्थानक आणि ग्रामपंचायत परिसरात शोध घेतल्यानंतर सर्वजण शेतातील मुंजोबा मंदीराच्या दिशेने निघाले. शेतातील विहिरीत डोकावून पाहिले असता सर्वांना विहिरीच्या पाण्यावरकुणीतरीतरुण तरंगतांना आढळून आला. जे कपडे प्रकाशने मंदीरात जातांना परिधान केले होते तेच कपडे पाण्यात तरंगणाऱ्या तरुणाच्या अंगावर दिसत होते. त्यामुळे हा नक्कीच प्रकाश असावा अशी त्याचे काका अर्जुन धोबी यांची खात्री झाली. त्यामुळे गावातील अजून काही जणांना विहीरीजवळ बोलावण्यात आले. हा हा म्हणता या घटनेची माहिती गावात पसरण्यास वेळ लागला नाही. बघता बघता घटनास्थळ असलेल्या विहीरीजवळ गर्दी जमण्यास सुरुवात झाली. या घटनेची माहिती धरणगाव पोलिस स्टेशनला समजली. पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले. दरम्यान गावकऱ्यांनी प्रकाशला विहीरीच्या पाण्यातून बाहेर काढले. त्याला गावातील सचिन पाटील या तरुणाच्या मालवाहू गाडीने धरणगावच्या सरकारी रुग्णालयात आणले. वैद्यकीय अधिका-यांनी तपासणीअंती त्याला मयत घोषित केले. मंदीरात दोघांना सोबत जातांना प्रकाशचे काका अर्जुन धोबी यांनी पाहिले होते. ते त्यावेळी प्रकाशसोबत बोलले देखील होते. मंदीर परिसरात दोघांचा शाब्दिक वाद होत असतांना अधिकार पाटील या तरुणाने पाहिले होते. याशिवाय मंदीरातून एकटीच आलेल्या ज्योतीने आपल्याला काहीच माहिती नाही असा आव आणत मुद्दाम शैलेंद्र पाटील या तरुणाकडे पती प्रकाश कुठे दिसला का? अशी विचारणा केली होती. सुरुवातीला या घटनेप्रकरणी धरणगाव पोलिस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. या अकस्मात मृत्यूच्या चौकशीकामी ज्योती धोबी हिला पोलिस स्टेशनला बोलावण्यात आले. तिची सर्व बाजूंनी चौकशी करण्यात आली. मात्र तिच्या बोलण्यात प्रत्येक वेळी विसंगती आढळून आली. पोलिसांनी केलेला तपास आणि ती सांगत असलेला घटनाक्रम काही केल्या जुळत नव्हता. अखेर तिने आपला गुन्हा कबुल केला. तब्बल दहा दिवसांनी या घटनेचा उलगडा झाला. मंदीरात पाया पडण्याच्या बहाण्याने प्रकाशला सोबत नेऊन त्याच्या अपंगत्वाचा गैरफायदा घेत त्याला विहीरीत ढकलण्याचे काम ज्योतीने केल्याचे तपासाअंती आढळून आले. त्याच्या मृत्यू प्रकरणी त्याचे काका अर्जुन धोबी यांनी धरणगाव पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीनुसार ज्योती धोबी विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.नं. २४२/२४ भा.द.वि. ३०२ नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेमुळे ज्योती आणि प्रकाश या दाम्पत्याची एक मुलगी आणि एक मुलगा असे दोघे जण माय बापाच्या कृपाछत्राला पारखे झाले आहेत. बाप देवाघरी आणि आई जेलमधे गेली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक पवन देसले आणि त्यांचे सहकारी सहायक फौजदार खुशाल पाटील, सहायक फौजदार निलेश बडगुजर, हे.कॉ. महेंद्र बागुल आदी करत आहेत.

## दोघांमध्ये रिक्षाच्या भाड्याचा वाद...

तो पळून गेला. पहाटेच्या सुमारास इतर लोकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्या जखमी इसमाला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल केलं खरं, पण तोपर्यंत खूपच उशीर झाला होती. डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केलं. चक्कन अली असे मृत समाचे नाव असून तो २९ वर्षाचा आहे. तर सैफ जहिद अली असे मारेकरी आरोपीचे नाव असून मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष ५ च्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून त्याला कल्याण रेल्वे स्टेशनमधून अटक केली. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत. सोमवारी पहाटे कुर्ला येथील पॅलेस रेसिडन्सी बार बाहेर एका इसमाचा मृतदेह सापडला होता. चक्कन अली असे त्याचे नाव होते. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असता, संशयाची सुई त्याचा मित्र सैफ याच्याकडे वळली. त्याला शोधण्यासाठी पोलिसांचे पथक कार्यरत होते. तो तडकाफडकी उत्तर प्रदेशातील त्याच्या गोंडा या गावी जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. अखेर मुंबई गुन्हे शाकेच्या कक्ष ५ च्या अधिकाऱ्यांनी सापळा रचला आणि पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या सैफ याला कल्याण रेल्वे स्थानकातून अटक केली. चौकशीदरम्यान त्याने गुन्हा कबूल केला. आरोपी सैफ आणि मृत इसम चक्कन (वय २९) हे दोघेही मित्र होते. रविवारी रात्री ते धारावीतून कुर्ल्याला रिक्षाने आले. रिक्षाचं भाडं ३० रुपये झालं. मात्र ते पैसे कोणी द्यायचे यावरून दोघांमध्ये बाचाबाची झाली. बघता बघता तो वाद खूप वाढला आणि टोकाला गेला. त्याच भांडणादरम्यान रागाच्या भरात सैफने चक्कनला मारहाण केली, तो गंभीर जखमी झाला. मात्र त्याला तशाच अवस्थेत टाकून सैफ तिथून पसार झाला. पहाटेच्या सुमारास काही लोकांनी त्याला जखमी अवस्थे पाहिलं आणि उपचारांसाठी रुग्णालयात नेलं पण तेथे डॉक्टरांन तपासून त्याला मृत घोषित केलं. याप्रकरणी आरोपी सैफविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आसून पोलिस अधिक तपास करत आहेत.

## लग्नाच्या दिवशीच शोकांतिका झाली...

दोन वर्ष दोघे ही एकमेकांना डेट केल्यानंतर त्यांनी विवाह बंधनात राहण्याचा आणि एकमेकांना गाठी मारण्याचा निर्णय घेतला. लिखिता ही २१ वर्षाची असल्याने तिच्या घरच्या लोकांनी तिच्या प्रेमविवाहाला कोणतीच हरकत घेतलेली नव्हती. अखेर ७ ऑगस्ट २०२४ रोजी चाम्बरासाहल्ली येथील एका मोठया हॉलमध्ये मोठया थाटामाटात दोघांचा विवाह नातेवाईक आणि मित्र मंडळीच्या उपस्थितीत पार पाडला. लग्नात आलेले गिफ्ट पाहण्यात या दोघांचा वेळ कसा गेला हे त्यांना कळालेच नाही. पै-पाहुण्याच्या बरोबर मित्रांच्या बरोबर लग्नात ते दोघे ही आपआपल्या मोबाईलमध्ये सेल्फी घेत होते. दोघे ही आनंदात आणि मजेत होते. तसा तो रात्रीच्या सुहाग रात्रीच्या वेळेची वाट पाहत होता.दाक्षिण्यात पध्दतीने आणि वैदीक पध्दतीने दोघांचा विवाह पार पडल्याने त्याची पहिली रात्र ही दोन दिवसांनी होणार होती.तो लग्नांतर तसा बैचन आणि उदास दिसत होता. आलेल्या पै-पाहुण्याचे मित्रांचे ते दोघे आदरतिथ्य करीत होते. परंतु दुपारनंतर नवीनचा मुड काहीसा खराब दिसत होता. तो कसल्या तरी टेन्शनमध्ये आणि विचारात होता. त्याला काही प्रॉब्लेम आहे का? असे लिखिताने विचारले. लग्नाच्या अगोदरपासून ते दोघे एकमेकांना डेट करीत असल्याने दोघांचा ही स्वभाव आणि गुण एकमेकांना माहित असणे अपेक्षीत होते. कापड व्यापारी असणारा नवीन हा तसा लोकांशी मनमोकळेपणाने बोलत असायचा. ग्राहकाशी कसा संवाद साधायचा याचा त्याला अनुभव होता. तशी त्याला कला अवगत होती. दोघांचे ही एकमेकांवर नितांत आणि खरे प्रेम असल्याने दोघांनी ही एकमेकांना गुण दोषासह स्विकारले होते. नवीनच्या घरच्यांना नवीनची बायको तशी नवीन नव्हतीच. लग्ना अगोरद तिचे नवीनच्या घरी येणे जाणे असायचे. त्यामुळे सुन म्हणून नवीनच्या घरच्या लोकांनी तिला आधीच स्विकारले होते. लग्नानंतर ती ज्यावेळी त्याच्या घरी यायची त्यावेळी तिला तिचे होणारे सासु सासरे चेष्टा मस्करीने नवीनचा स्वभावाबद्दल बोलायचे. तो थोडासा रागीट आहे त्याला राग लवकर येतो बघ. त्याच्याशी थोडे ॲडजेस्टमेट करून घयावी लागेल असे ते बोलयाचे पण प्रेम केले असल्याने तिला तो आहे तसाच आवडायचा. त्यामुळे तिला नवीनचा रागीट आणि तापट स्वभाव माहित होता. या उलट तिचा स्वभाव हा सतत हस्तमुख असायचा. आज तर नवीनला खुश असायला हवे होते. पण तो कसल्या तरी विचारात आणि टेन्शनमध्ये दिसत असल्याने ती ही थोडी काळजीतच होती. कुठल्या तरी कारणातून तो तिच्यावर सारखा चिडत होता. तरीही ती समजुतदार पणा दाखवित होती. तिने ही त्याच्याबरोबर नवीन स्वपने रंगविली होती. ती स्वप्ने त्या दोघांना ही पुर्ण करायची होती. कापड व्यापारात असणारा नवीन तसा व्यवहारीक दृष्टया हुशार होता. त्याला जीवनात ॲडजेस्टमेट नको होती. तर तिला मेडिकलचे शिक्षण पुर्ण करून त्यामध्ये ती करियर करू इच्छित असल्याने तिने लग्नानंतर घरगृहस्थी सांभाळावे असे त्याचे मत होते. दोघांच्या विचारात थोडासा फरक होता. येथेच दोघांच्यात वैचारीक मत भिन्नता होत होती. परंतु लग्नानंतर दोघे ही एकमेकांना समजून घ्यायला तयार होते. पण होणी को कोन टाल सकता है तसे त्याचे ही झाले होते. लग्नाच्या पहिल्याच दिवशी नवीन टेन्शनमध्ये होता. प्रेम विवाहानंतर अनेकांनी त्या दोघांना शुभेच्छा देत नव दाम्पत्यंना शुभ आशीर्वाद दिले. त्याचवेळी संध्याकाळी सहाच्या दरम्यान तिला व नवीनला एका जवळच्या नातेवाईकांने चहापाणला आपल्या घरी बोलवले. नवीन जोडप्याची सरबराई करण्यात नातेवाईक मग्न होते. त्याच्या घरी गेल्यानंतर नवीन आणि लिखिता यांनी जलपान केले.आराम करण्यासाठी दोघे ही वरच्या खोलीत गेले. काही वेळातच त्या दोघामध्ये कुठल्या तरी कारणातून वाद सुरू झाला. दोघे ही निवांत असताना लिखिताने त्याला फक्त एवढेच विचारले की, तुमच्या मुडला आज काय झाले.?तुम्ही नर्व्हस का आहात? दोघे ही कन्नडमध्ये एकमेकांवर कसला तरी आरोप करू लागले. त्यातच लिखिताने माझ्याबरोबर लग्न करून तु खुश नाहीस का? असे म्हटल्यावर त्याला तिचा राग आला. नातेवाईकांच्या घरातील वरच्या रुममध्ये ते दोघे होते. दोघांनी ही रुमचा दरवाजा आतून बंद करून घेतला होता. दोघांच्या ही भांडणाचा आवाज खाली बसलेल्या पै -पाहुण्यांना येत होता. दोघे ही नुकतेच विवाहबंधनात अडकले असल्याने दोघांच्या ही क्षुल्लक भांडणात कशाला मध्ये पडायचे म्हणून सुरूवातीला नातेवाईकांनी लक्ष दिले नाही. परंतु दहा पंधरा मिनिटातच त्याच्या भांडणाचा आवाज वाढला. दोघे ही एकमेकांवर तोंड सुख घेत होते. तिने त्याला काही तरी म्हटले याचा राग त्याला आला.अगोदरच त्याचा स्वभाव हा रागीट आणि तापट होता. त्याने रागच्या भरात पाहुण्याचा घरात असलेली कुऱ्हाड उचलली आणि लिखिताच्या डोक्यात आणि मानेवर घातली. त्यासरशी ती रक्ताच्या थारोळ्यात ओरडत खाली पडली. तिच्या ओरडण्याचा आवाज ऐकून खाली बसलेले पाहुणे वरच्या रुमकडे आले. दरवाजा आतून बंद करून घेतला असल्याने त्यांनी दोघांनाही दरवाजा उघडण्यास सांगितले.परंतु आतून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. म्हणून पाहुण्यांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. त्याचवेळी नवीनने आपल्याकडील चाकूने आपल्या गळ्यावर आणि हातावर वार करून घेतले असल्याने तो ही रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. बाजुलाच रक्ताने माखलेली कुऱ्हाड आणि चाकू ही पडला होता. या घटनेत लिखिताचा जागीच मृत्यु झाला होता.तर नवीन हा गंभीर जखमी झाला होता. त्याची तडपड चालू होती. पै-पाहुण्याच्या घरात रक्ताचा सडा पडला. आतील दृश्य हे मन हेलावणारे होते. या घटनेची माहिती नातेवाईकांनी जवळच्या एंडरसन पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आली. पोलीस येईपर्यंत नातेवाईकांनी ॲब्युलियन्सला फोन लावला. ॲब्युलीयन्स काही लवकर येईना म्हणून त्यांनी ॲटो रिक्षा करून जवळच्या जालाप्पा हॉस्पिटलमध्ये नवीनला उपचारसाठी दाखल केले. तोपर्यंत पोलीस ही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून तेथे असणाऱ्या नातेवाईकाडून या घटनेची माहिती घेतली. या घटनेतील दोघे ही मयत असल्याने पोलीसांनी त्याच्या, त्याच्या नातेवाईकाकडून या घटनेची फिर्याद लिहून घेतली गेली. गुन्हा दाखल करून एंडरासन पोलीस या घटनेचा पुढील तपास करीत आहेत. लग्नाच्या पहिल्या काही तासातच नवीनने तिला का? मारावे असा प्रश्न पोलीसांना पडला होता. नवीन हा कापड व्यापारी असल्याने तो कोणत्या आर्थिक अडचणीत होता का? की, लग्नाअगोदर त्याच्या शिवाय अन्य कोणाशी लिखिताचे प्रेमसंबंध होते आणि त्याची माहिती त्याला मिळाली असेल म्हणून त्या दोघात वाद होऊन त्याने रागाच्या भरात पत्नीला संपविले आणि भांडणात स्वत:वरही वार करून घेतले याचा तपास पोलीस करीत आहेत. परंतु काही झाले तरी नवदांमप्त्याचे लग्नाच्या पहिल्या काही तासातच हातावरची मेहंदी ही अजुन सुकली नाही तोवर असा दुर्देवी अंत होणे हे न उलघडणारे कोडे पोलीस काही दिवसात उलघडून दाखवितील परंतु घटना शब्दबध्द होईपर्यत मात्र या घटनेचा संस्पेस वाढला एवढे मात्र निश्चित म्हणावे लागेल.

क्राईम संध्या | सोमवार दि. १९ ऑगस्ट २०२४ ते रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# जळगाव येथील डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा





**जळगाव/प्रतिनिधी**

डॉ.अण्णासाहेब जी डी बेंडाळे महिला महाविद्यालय जळगाव मधील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी म्हणजेच स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर सकाळी ८:०० वाजता 'हर घर तिरंगा' प्रभात फेरी काढण्यात आली. महाविद्यालयातील कौशल्य विकास प्रशाले तर्फे तयार करण्यात आलेला ७५ फूट लांब तिरंगा ध्वज घेऊन प्रभात फेरी काढण्यात आली. सदर रॅलीमध्ये देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. त्याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या आदरणीय डॉ. गौरी राणे, नंदिनीबाई वामनराव जुनिअर कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती चारुलता पाटील, उपप्राचार्य प्रा. डॉ विलास पाटील, डॉ. पी. एन. तायडे, प्रा. सुनीता पाटील, शा. ल. खडके प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अंजना सुरवाडे, उपप्राचार्य सौ. सुजाता फेगडे, एन एस एस कार्यक्रम अधिकारी डॉ. शीला राजपूत, प्रा. रत्नप्रभा महाजन, डॉ. दिपक किनगे, डॉ अनिता कोल्हे, प्रा. सायली पाटील, प्रा. अनिल बेलसरे, प्रा. नुरी तडवी आणि बेंडाळे महाविद्यालय, नंदिनीबाई वामनराव विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय व शा. ल. खडके प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक, सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि ५००-६०० विद्यार्थिनी यांनी तिरंगा प्रभात फेरीमध्ये सहभाग घेतला.

# शिक्षकाकडून विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचाराचे तीव्र पडसाद

**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेच्या यादवेश विकास शाळेत १४ वर्षीय विद्यार्थिनीवर शाळेतील शिक्षकाकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराचे तीव्र पडसाद उमटले आहे. मंगळवारी संतप्त पालकांनी शाळेबाहेर उग्र आंदोलन करून शाळा बंद करण्याची मागणी केली. शाळेत अनेक मुलींसह शिक्षिकांचे देखील लैंगिक शोषण झाल्याचा आरोप पीडित मुलीच्या भावाने केला आहे. नालासोपारा पूर्वेच्या संतोष भुवन येथे यादवेश विकास इंग्रजी शाळा आहे. आरोपी अमित दुबे (३०) हा या शाळेत शिक्षक आहे. तसेच तो वलईपाडा येथे उज्वल नावाचे खासगी शिकवणी वर्ग (क्लासेस) घेतो. दुबे यांने शाळेतील १४ वर्षीय विद्यार्थिनीवर सतत ५ महिने लैंगिक अत्याचार करत असल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. पीडित विद्यार्थिनीला धमकावून तो शाळा आणि शिकवणी वर्गात (क्लासेस) बलात्कार करत होता. पीडितेच्या कुटुंबियांना



हा प्रकार समजताच त्यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पेल्हार पोलिसांनी आरोपी शिक्षक अमित दुबे याला अटक केली आहे. हा प्रकार समजताच मंगळवारी सकाळी संतप्त पालकांनी शाळेबाहेर उग्र निदर्शने करून शाळा बंद करण्याची मागणी केली. शाळेच्या व्यवस्थापकाला पीडित मुलीने आरोपी शिक्षकाकडून त्रास होत असल्याचे सांगूनही त्याने दुर्लक्ष केले आणि पीडितेला गप्प बसण्यासाठी सांगितले, असा आरोप मुलीच्या पालकांनी केला. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पीडित मुलीच्या भावाने शाळेच्या व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहे. यापूर्वी शाळेतील २० ते २५ मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप त्याने केला. शाळेतील शिक्षिका देखील या अत्याचाराला बळी पडली असून तिने शाळा सोडल्याचे त्याने सांगितले. माझी बहीण शाळेत बेशुद्ध पडली मात्र शाळेने प्रकार दडवला आणि आरोपींना पाठीशी घातले. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापकावरही गुन्हे दाखल करून ही शाळा बंद करण्याची मागणी केली. पेल्हाप पोलिसांनी आरोपी अमित दुबे याला भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४ (२) (एफ) ६५ (१) तसेच बालकांच्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो)च्या कलम ४, ५.८ व १२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. शाळा परिसरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी बंदोबस्त ठेवला आहे.

# मंद्रूप पोलीस ठाण्याचा सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार स्वीकारला पद्भार



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रशांत हुले यांची सातारा जिल्ह्यात बदली झाली आहे. त्यामुळे मंद्रूप पोलीस ठाण्याचा पदभार मनोज मोहन पवार यांनी स्वीकारला. शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जाणारे सहाय्यक पोलिस निरीक्षक हुले यांनी एक वर्षाच्या कार्यकाळात लोकाभिमुख प्रशासन राबवून जनतेला न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. ३८ गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यात ते यशस्वी झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यात त्यांचा पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्याने त्यांची बदली सातारा जिल्ह्यात झाली आहे. त्यांच्या ठिकाणी सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार बदलून आले आहेत. पवार ही कर्तव्य कठोर आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात. मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करु अशी ग्वाही त्यांनी यावेळी संवाद साधताना दिली.

# डोंबिवलीतपत्नीसह मित्रांकडून छळ अन् ब्लॅकमेलिंग, हताश पतीचं टोकाचं पाऊल

**डोंबिवली/प्रतिनिधी**

डोंबिवली पश्चिमेतील भगवान काठेनगरमध्ये राहणाऱ्या ४२ वर्षीय इसमाने गळफास लावून आत्महत्या केली होती. आठ महिन्यांपूर्वी घडलेल्या या घटनेप्रकरणी विष्णूनगर पोलिसांनी मंगळवारी सदर इसमाच्या पत्नीसह तिच्या मित्रांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पत्नीने मित्रांच्या मदतीने छळ करून, त्याला मानसिक, शारीरिकदृष्ट्या त्रास देऊन त्याला आत्महत्या करण्यास भाग पाडल्याचे पोलिसांनी केलेल्या तपासात उघडकीस आले आहे. मृत इसमाच्या भावाने संशय व्यक्त करून तशी फिर्याद दाखल केली होती. सुधाकर यादव (४२) असे मयत पतीचे नाव आहे. तर संजना यादव (३१) आरोपी पत्नीचे नाव आहे. संजनाने महम्मद शेख, महेश पाटील आणि एक अनोळखी इसमाच्या सहकार्याने पतीचा मानसिक छळ केला. त्याला विविध प्रकारे त्रास देऊन त्याचं जगणं कठीण केलं. पत्नीसह तिच्या मित्रांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून २० डिसेंबर २०२३ रोजी सुधाकर यादव यांनी घरात एकटे असताना गळफास घेत आत्महत्या केली. सुधाकरचा बदलापूर येथे राहणारा भाऊ प्रभाकर यशवंत यादव (४४) याने भावाच्या आत्महत्येप्रकरणी संशय व्यक्त करून पोलिस ठाण्यात २२ मे २०२४ ला तक्रार अर्ज दिला होता. या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी सखोल चौकशी सुरू केली.या चौकशीत सुधाकरला त्याची पत्नी संजना आणि आरोपी मित्र हे खूप त्रास देत असल्याचं पुढे आलं. या त्रासाला कंटाळून सुधाकर यादवने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचं समोर आलं. भावाने आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठी लिहून त्यामध्ये त्याच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या व्यक्तींची नावे नमूद केली




होती. ही चिठ्ठी पोलिसांनी घटनास्थळाजवळून जप्त केली. भावाचे फेसबुक अकाउंट हॅक झाले होते. भावाला काही लोक फोनवर त्याने फेसबुकवर वैयक्तिक केलेले चॅटींग व्हॉयरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करत होते. चॅटींग केलेले पुरावे आमच्या जवळ आहेत, ते व्हॉयरल न करण्यासाठी हे लोक पैशांची मागणी करत होते. त्यानंतर भावाने घाबरून त्याच्या बायकोच्या अकाउंटमधून ऑनलाईनद्वारे महम्मद शेख याला ५ हजार, महेश पाटील याला ५ हजार रूपये ट्रान्सफर केले. त्यानंतर सुधाकर याला त्याची पत्नी संजनाने महम्मद शेख याला २० हजार रूपये दिले. त्या मोबल्यात महम्मद शेख याच्याजवळ असलेले सुधाकरचे पर्सनल चॅटींग आणि व्हिडीओ मागवून घेतले. यावरून संजना आणि तिच्या मित्रांनी सुधाकर याला ब्लॅकमेल करून त्याचा मानसिक छळ केला. हा छळ असह्य झाल्यामुळेच आपल्या भावाने शेवटचे टोक गाठल्याचा आरोप प्रभाकर यादव यांनी त्यांच्या तक्रारीत केला आहे. स्वतःचे हस्ताक्षरात लिहुन ठेवलेल्या चिठ्ठीमधील अक्षर माझ्या भावाचेच असल्याचे सांगून आरोपींवर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी त्यांनी अर्ज केला होता. पोलिसांनी आठ महिने केलेल्या तपासानंतर पत्नी संजनासह तिच्या मित्रांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक गणेश देवरे प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# माझं लातूर परिवाराने केले ५ हजार तिरंगा ध्वजाचे वितरण



**लातूर/प्रतिनिधी**

हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शासनाच्या अभियानांतर्गत माझं लातूर परिवाराच्या वतीने शहरात ५ हजार तिरंगा ध्वजाचे मान्यवरांच्या हस्ते मोफत वितरण करण्यात आले. शहरातील सर्वसामान्य नागरीकांना आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकविता यावा, देशाच्या या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होता यावे या उद्देशाने हनुमान चौक येथे १४ ऑगस्ट २०२४ बुधवार रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मान्यवरांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे मोफत वितरण करण्यात आले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी कुटुंबातील महिला सदस्यांना घरावर ध्वज फडकविण्याचा मान द्यावा तसेच ध्वजासोबत सेल्फी घेऊन www.harghartiranga.com या संकेतस्थळावर अपलोड करावा असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

हनुमान चौक येथे पार पडलेल्या मोफत तिरंगा ध्वज वितरण सोहळ्यात शहर वाहतूक पोलिस शाखेचे निरीक्षक गणेश कदम, माझं लातूर परिवाराचे सतिश तांदळे, अभय मिरजकर, डॉ.सितम सोनवणे, गोपाळ झंवर, शिलरत्न सोनवणे, डॉ.जुगलकिशोर तोष्णीवाल, उत्तम लोंढे यांच्या हस्ते नागरीकांना ध्वज वितरीत करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी रविंद्र गट्टानी, प्रितेश भंडारी, सोमनाथ मेदगे, जाकेर सय्यद, नरेश घंटे, दत्तराम कराड यांच्यासह माझं लातूर परिवाराच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# चाकूरच्या केंद्रीय सुरक्षा दलाच्या 'हर घर तिरंगा' उपक्रमास प्रतिसाद



**चाकूर/प्रतिनिधी**

हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत आज दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर येथे तिरंगा दौडला प्रशिक्षण केंद्राचे महानिरीक्षक कमांडर मदनपाल सिंह हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. यावेळी इतर सर्व अधिकारी आणि अधीनस्थ अधिकारी देखील उपस्थित होते. यामध्ये सर्व श्रेणीतील १ हजार १२० जवान सहभागी झाले होते. मोटार सायकल तिरंगा रॅलीला श्रीमती नविता शर्मा बावा, प्रमुख सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर आणि विनीत कुमार, महानिरीक्षक यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या रॅलीमध्ये प्रशिक्षण केंद्रातील सर्व प्रकारच्या ७० मोटरसायकलस्वारांनी प्रशिक्षण केंद्राच्या मुख्य गेटपासून रॅलीसह प्रत्येक घरापर्यंत तिरंगा मोहीम जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेण्याचे काम केले. वाहनात देशभक्तीपर गीते वाजवून सर्व चाकूरवासीयांच्या मनात देशभक्तीचे रंग भरले गेले व या रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. इड- ने कौतुक केले. श्रीमती नविता शर्मा, बावा मुख्याध्यापक सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर यांनी ५ किमी तिरंगा यात्रा मार्चला हिरवा झेंडा दाखवला. ज्यामध्ये केंद्रीय विद्यालय चाकूरचे विद्यार्थी आणि शिक्षक देखील उत्साहाने सहभागी झाले होते. या उपक्रमाने सर्वांच्या मनात देशभक्तीची भावना ओतप्रोत भरल्याचे दिसून आले.

# घणसोली येथे २५ वर्षीय युवकाची हत्या

नवी मुंबई : ठाणे-पनवेल महामार्गावर घणसोली येथे एका २५ वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्याच्या शरीरावर तीक्ष्ण हत्याराने वार केल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात हत्येचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. हत्या चार तारखेला झाली असावी असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. सुजितकुमार रामसजिवन बिंद्र असे यातील मयत व्यक्तीचे नाव आहे. त्याचा मृतदेह ठाणे-बेलापूर मार्गावर घणसोली रेल्वे स्थानकानजीक असलेल्या एका हॉटेलपुढे रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडीत आढळून आला आहे. मृत व्यक्तीजवळ आढळून आलेल्या कागदपत्रांवरून त्याची ओळख पटली असून तो डम्पिंग रस्ता, मुलुंड येथे राहतो तर मूळ उत्तर प्रदेश येथील प्रतापगढ येथील रहिवासी आहे. त्याच्याकडील कागदपत्रात आढळलेल्या पत्त्यावर पाहणी केली असता त्याचा मोठा भाऊ पवनकुमार हा आढळून आला. त्याला याबाबत माहिती दिल्यावर त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी हत्येचा गुन्हा नोंद केला आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि. पालघर**

**ऑफ लाईन निविदा सूचना क्र.२० सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील (ऑफ लाईन) सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील **योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून** खालील कामांकरीता मागवित आहेत. कोरे निविदा नमुन्याची विक्री कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार येथे खालील दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

टिप : सदर निविदा सुचनेमध्ये एकूण ०६ (सहा) कामे समाविष्ट आहेत. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांचे कार्यालयातील सूचना फलकावर सदरची ऑफ लाईन निविदा पाहावयास मिळेल.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची मुळ किंमत रु. लक्ष | इसारा रक्कम रुपये | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | डुंगाणीपाडा कुंडाचापाडा ते प्रजिमा १५ रस्ता मजबूतीकरण करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ७,९२,५६४.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| २. | उंबरखेडा साखरशेत खंबाळा रस्त्याची सुधारणा करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ७,९३,०७८.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| ३. | सावरपाडा हंडीपाडा रस्त्याची सुधारणा करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ७,९३,४३२.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| ४. | पागीपाडा ते शेलटीचापाडा रस्त्याची सुधारणा करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ७,९२,६५८.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग० ५०५४५११७-५३ |
| ५. | रा.मा. ७२ ते केळीचापाडा जोड रस्त्याची सुधारणा करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ७,९३,१७७.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |
| ६. | आकरे मेघवालपाडा रस्त्याची सुधारणा करणे. ता. जव्हार, जि. पालघर | ७,९२,३३५.०० | ९,०००.०० | वर्ग ७ व त्यावरील | रु. ५००/- +१८% जिएसटी रु. ९०/- एकूण : ५९०/- | १०० दिवस (पावसाळा धरून) | ५०४५ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग ५०५४५११७-५३ |

**निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक : २१/०८/२०२४ ते दिनांक : २८/०८/२०२४ पर्यंत**
**निविदा स्विकृतीचा - दिनांक : २९/०८/२०२४ (दुपारी १४.०० वाजेपर्यंत)**
**निविदा उघडणे (शक्य झाल्या) - दिनांक : ३०/०८/२०२४ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

टिप :-
१. ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.
३. ठेकेदाराने कोरे निविदा नमुने पोष्टाने मागविल्यास ठेकेदारांच्या जबाबदारीवर पाठविले जाईल. त्यास विलंब झाल्यास खाते जबाबदार राहणार नाही. त्यासाठी रु. २००/- जादा आकार पडेल.

**जा.क्र.: सा.बां.वि./जव्हार/निविदा/९२२३**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड ४०१ ६०३
फोन नं. ०२५२०-२२२२३६
दिनांक : १४/०८/२०२४

**सही/-**
**उप कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**जव्हार, जि. पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि ४४/३३०/२०२४ दिनांक : १६/०८/२०२४**

19 TO 25 AUGUST 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1  8/17/2024  8:05 PM  Page 1



# वाचाळ वीरांचे धर्मसंकट!

बांगलादेशात जे काही सुरू आहे ते माणुसकीला काळीमा लावणारे आहे, यात वादच नाही. कारण कुठल्याही राष्ट्रात अल्पसंख्यांकाच्या सुरक्षेची जबाबदारी तिथल्या सरकार वर असते. परंतु बंगला देशात ती जबाबदारी सरकारने पाळली नाही. त्यामुळे २७ जिल्ह्यांमध्ये हिंदूंवर तिथल्या कट्टरपंथीयांनी अत्याचार केले. दुर्दैवाने पंतप्रधान हसीनाना सुद्धा देश सोडावा लागल्याने, तिथे सरकारच अस्तित्वात नव्हते. त्यामुळे असा भयंकर उतपात झाला. पण तिथल्या घटनांचा इथे राग काढणे हे काही बरोबर नव्हते. बांगलादेशातील घटनांचा निषेध व्हायला हवा. परंतु तिथे हिंदूंवर अत्याचार झाले म्हणून, इथल्या मुसलमानांना टार्गेट करणे योग्य ठरणार नाही. कारण त्यातून भयंकर असा जातीय तनाव निर्माण होऊ शकतो. आणि सध्या तरी या देशाला धार्मिक तणाव परवडणारा नाही. एकीकडे बांगलादेशातील घटनांचे भारतात पडसाद उमटत असताना, लोकांची समजूत घालून त्यांना शांत करण्याऐवजी, इथले काही वाचाळ वीर आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न करीत आहेत. खास करून अंगावर भगवे कपडे घातलेल्या लोकांना आपल्या जबाबदारीची जाणीव राहिलेली नाही. ज्यावेळी आपण धर्माला किंवा धर्माच्या प्रचाराला वाहून घेतो, तेव्हा आपल्या धर्माचा प्रचार करीत असताना, आपल्या धर्माची ध्येय धोरणे लोकांना समजावून सांगत असताना, दुसऱ्या धर्मावर टीकाटिप्पणी करणे अत्यंत चुकीचे आणि बेजबाबदारपणाचे आहे. खास करून महाराष्ट्रासारख्या शाहू फुले आंबेडकरांच्या धर्मनिरपेक्ष राज्यात धार्मिक तणावाला प्रोत्साहन देणाऱ्या घटना घडता नयेत. महाराष्ट्राला थोर संत परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांपासून संत तुकाराम महाराजांपर्यंत अनेक महान संत या राज्यात होऊन गेले. त्या काळात प्रचंड जातीभेद असताना, तसेच समाजावर वर्णव्यवस्थेचा प्रचंड प्रभाव असताना, आमच्या संतांनी सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली. पुढे त्याच शिकवणीच्या मार्गावरून चालताना, छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी, सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र केले. हा आहे महाराष्ट्राच्या धर्मनिरपेक्षतेचा गौ रवशाली इतिहास! या इतिहासाला नख लावण्याचा जर कुणी प्रयत्न करीत असेल, तर त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई करायला हवी. शांतिगिरी महाराज नावाच्या एका महंताने मोहम्मद पैगंबर विषयी जे काही वादग्रस्त वक्तव्य केलं, त्या विरुद्ध खरं म्हणजे सरकारने कारवाई करायला हवी होती. परंतु कारवाई दूरच राहिली, मुख्यमंत्री स्वतः रामगिरी महाराजांच्या मांडीला मांडी लावून बसले. याचा अर्थ काय? शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राचा मुख्यमंत्री इतका जातीयवादी झाला आहे का? की धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या लोकांना पाठीशी घालून त्यांच्या रक्षणासाठी उभा राहिलेला आहे. मग मुख्यमंत्री जर अशी भूमिका घेत असतील तर सर्वसामान्य माणसांचे काय? महाराष्ट्राच्या इतिहासात असे कधीच घडले नव्हते. राज्याचा मुख्यमंत्री हा कुठल्या एका धर्माचा किंवा पक्षाचा नसतो. तर तो राज्यातील बारा कोटी जनतेचा प्रतिनिधी असतो. ज्यामध्ये हिंदू, मुसलमान, शीख, बौद्ध ,ख्रिश्चन सगळ्या धर्माचे लोक येतात. आणि या सर्वाचा तो प्रतिनिधी असतो. अशावेळी एखाद्या संत महांताने दुसऱ्या धर्मावर टीकाटिप्पणी केली तर त्याला रोखण्याचे काम राज्याचा प्रमुख या नात्याने मुख्यमंत्र्यांनी करायला हवे होते. परंतु मुख्यमंत्र्यांना मुख्यमंत्री धर्माचा आणि जनतेपती असलेल्या आपल्या कर्तव्याचा विसर पडला. त्यामुळेच महाराष्ट्राच्या काही भागात तोडफोड सुरू झाली. दोन समाज एकमेकांच्या विरोधात रस्त्यावर उतरले. काय प्रकार आहे हा? निवडणुकीच्या तोंडावर अशा प्रकारच्या दंगली कुणाला घडवायच्या आहेत का? आणि त्यासाठीच असे प्रयत्न केले जात आहेत का? अशी आता शंका यायला लागली. या सर्व गोष्टीचा विचार महाराष्ट्रातील सुज्ञ जनतेने करायला हवा. लोकांची धर्माशी बांधिलकी जरूर आहे. परंतु धर्मासाठी रस्त्यावर उतरून एकमेकांची डोकी फोडण्याला इथल्या लोकांचा विरोध आहे. कारण महाराष्ट्रावर शाहू फुले आंबेडकर यांच्यासारख्या समाजसुधारकांचे आणि संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम यांच्यासारख्या महान संतांचे संस्कार आहेत. हे संस्कार कायम टिकून राहायला हवेत. आणि महाराष्ट्र पूर्णपणे धार्मिक तनाव मुक्त व्हायला हवा. बांगलां देशात जे काय घडले त्याच्याशी इथल्या लोकांना काडीचाही संबंध नाही. पण बांगलादेशातील घटनांचे निमित्त करून, इथे एका विशिष्ट समाजाला टार्गेट करणे आणि जातीय दंगली भडकवणे हे मात्र भयंकर आहे. ते जर थांबले नाही तर महाराष्ट्रात येणारा काळ बांगलादेश पेक्षाही भयावह असेल. म्हणूनच इथल्या राज्यकर्त्यांनी, मग सरकार कुठल्याही पक्षाच असो त्यांनी धार्मिक तणाव निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करायला हवी. सरकारने जाती-धर्माविषयी वादग्रस्त विधाने करणाऱ्या लोकांना योग्य ती समज द्यावी. धर्मी भावना दुखावणारे सामाजिक स्थैरासाठी घातक असतात. त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. मग तो कुठलाही राजकीय पुढारी असो, किंवा कुठला संत महात्मा असो, कायद्यासमोर सगळे सारखे असतात. हे सरकारने विसरता नये. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे सरकारचा जो प्रमुख आहे त्याने अशा लोकांपासून दूर राहायला हवे. तरच सरकार आणि मुख्यमंत्री यांच्यावर सर्व जाती धर्माच्या लोकांचा विश्वास बसेल. अन्यथा मुख्यमंत्री एका धर्माची बाजू घेतात असं जेव्हा इतर धर्माच्या लोकांना वाटेल, तेव्हा मात्र परिस्थिती हाताबाहेर गेलेली असेल.

# महाराष्ट्रातील तीन पोलीस अधिकाऱ्यांना 'राष्ट्रपती पोलीस पदक' प्रदान

## १७ पोलिस अधिकारी पोलीस शौर्य पदक व ३९ पोलिस कर्मचाऱ्यांना पोलीस पदक प्रदान



**नवी दिल्ली/प्रतिनिधी**

पोलीस सेवेतील उल्लेखनीय कार्यासाठी ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्व संध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून पोलीस पदके देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील चिरंजीवी रामछाबिला प्रसाद, राजेंद्र बालाजीराव डहाळे, सतीश राघवीर गोवेकर या पोलिस अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक' प्रदान करण्यात आले. यासह राज्यातील १७ पोलिस अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्याना 'पोलीस शौर्य पदक' तर ३९ पोलिसांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी 'पोलीस पदक' असे राज्यातील एकूण ५९ पोलिसांना पदके प्रदान कण्यात आली. 'राष्ट्रपती पोलीस शौर्य पदक' आणि 'पोलीस शौर्य पदक', जीवन आणि मालमत्ता यांचे संरक्षण, गुन्हेगारीला पायबंद आणि गुन्हेगारांना अटक करण्यासाठी उल्लेखनीय शौर्यासाठी दिले जाते. विशिष्ट सेवेसाठी 'राष्ट्रपती पोलीस पदक' पोलीस सेवेतील खास उल्लेखनीय कामगिरीसाठी दिले जाते. गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक' संसाधन आणि कर्तव्यनिष्ठेने बजावलेल्या अमूल्य सेवेसाठी प्रदान केले जाते. वर्ष २०२४ च्या स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभरातील एकूण ९०८ पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांना 'पोलीस पदके' प्रदान करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील ५९ पोलिसांचा समावेश आहे. विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकांमध्ये राज्याचे चिरंजीवी रामछाबिला प्रसाद, अतिरिक्त पोलिस महासंचालक, राजेंद्र बालाजीराव डहाळे, संचालक, सतीश राघवीर गोवेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचा समावेश आहे.

राज्यातल्या १७ पोलिसांना पोलीस शौर्य पदक' प्रदान करण्यात आले. पोलीस शौर्य पदकांमध्ये डॉ. कुणाल शंकर सोनावणे - उप-विभागीय पोलीस अधिकारी, दीपक रंभाजी आवटे - पोलीस उपनिरीक्षक, कै. धनाजी तानाजी होनमाने - पोलीस उपनिरीक्षक (मरणोत्तर), नागेशकुमार बोंड्यालू मदरबोईना - नाईक पोलीस शिपाई, शकील युसुफ शेख - पोलीस शिपाई, विश्वनाथ सामैय्या पेंदाम - पोलीस शिपाई, विवेक मानकू नरोटे - पोलीस शिपाई, मोरेश्वर नामदेव पोटावी - पोलीस शिपाई, कैलाश चुंगा कुळमेथे - पोलीस शिपाई, कोटला बोटू कोरामी - पोलीस शिपाई, कोरके सन्नी वेलादी - पोलीस शिपाई, महादेव विष्णू वानखेडे - पोलीस शिपाई, अनुज मिलिंद तारे (आयपीएस) -अतिरिक्त पोलीस अधीक्षक, राहुल नामदेवराव देव्हाडे - पोलीस उपनिरीक्षक, विजय दादासो सकपाळ - पोलीस उपनिरीक्षक, महेश बोरू मिच्छा - मुख्य शिपाई, समय्या लिंगय्या आसाम - नाईक पोलीस शिपाई यांचा समावेश आहे. गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राज्यातल्या ३९ पोलिसांनापोलीस पदकने सन्मानित करण्यात आले. यामध्ये - दत्तात्रय तुळशीदास शिंदे- उपमहानिरीक्षक, संदीप गजानन दिवाण- उपमहानिरीक्षक, शिवाजी ज्ञानदेव फडतरे- उप-अधीक्षक, संजय मारुती खांदे-अधीक्षक, विनीत जयंत चौधरी-उपअधीक्षक, प्रकाश पांडुरंग गायकवाड-उपनिरीक्षक, सदानंद जनाबा राणे- निरीक्षक, विजय मोहन हातिसकर-पोलीस सहआयुक्त, महेश मोहनराव तराडे-उप अधीक्षक, राजेश रमेश भागवत- निरीक्षक, गजानन कृष्णराव तांदूळकर- उपनिरीक्षक, राजेंद्र तुकाराम पाटील- उपनिरीक्षक, संजय साहो राणे-उपनिरीक्षक, गोविंद दादू शेवाळे-उपनिरीक्षक, मधुकर पोछा नैताम- उपनिरीक्षक, अशोक बापू होनमाने-निरीक्षक, शशिकांत शंकर तटकरे-उपनिरीक्षक, अक्षयवारनाथ जोखुराम शुक्ला-उपनिरीक्षक, शिवाजी गोविंद जुंदरे- उपनिरीक्षक, सुनील लयाप्पा हांडे-सहाय्यक उपनिरीक्षक, प्रकाश मोतीराम देशमुख-उपनिरीक्षक, दत्तू रामनाथ खुळे- सहाय्यक उपनिरीक्षक, रामदास नागेश पालशेतकर- निरीक्षक (पीए), देविदास श्रावण वाघ-सहाय्यक उपनिरीक्षक, प्रकाश शंकर वाघमारे-सहाय्यक उपनिरीक्षक, संजय दयाराम पाटील- सहाय्यक उपनिरीक्षक, मोनिका सॅम्युअल थॉमस- सहाय्यक उपनिरीक्षक, बंडू बाबुराव ठाकरे- मुख्य शिपाई, गणेश मानाजी भामरे- मुख्य शिपाई, अरुण निवृत्ती खैरे- मुख्य शिपाई, दीपक नारायण टिल्लू- मुख्य शिपाई, राजेश तुकारामजी पैदलवार- मुख्य शिपाई, श्रीकृष्ण गंगाराम हिरपूरकर-सहाय्यक कमांडंट, राजू संपत सुर्वे-निरीक्षक, संजीव दत्तात्रेय धुमाळ- निरीक्षक, अनिल उत्तम काळे-सहाय्यक उपनिरीक्षक, मोहन रामचंद्र निखारे- सहाय्यक उपनिरीक्षक, द्वारकादास महादेवराव भांगे-सहाय्यक उपनिरीक्षक, अमितकुमार माताप्रसाद पांडे- उपनिरीक्षक यांचा समावेश आहे. सविस्तर यादीचा तपशील www.mha.gov.in आणि https://awards.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# शेतीला सौर ऊर्जा, शेतकऱ्यांमध्ये चैतन्य

देशातील ऊर्जेच्या एकूण वापरापैकी कृषी क्षेत्रासाठी सुमारे २२ टक्के वापर होतो. महाराष्ट्रात सुमारे ४५ लाख कृषी वीज ग्राहक असून ते वीजेचा वापर हा मुख्यत: कृषी पंपासाठी करतात. शेतकऱ्यांना पूर्वी चक्रीय पद्धतीने दिवसा आणि रात्री वीजपुरवठा केला जात होता. शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात सिंचन करताना अनेक अडचणींना सामना करावा लागत असे. यावर उपाय म्हणून शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना १४ जून २०१७ साली सुरू केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी या योजनेत आवश्कतेनुरूप बदलही करण्यात आले. तथापि, या योजनेच्या अंमलबजावणीचा अनुभव व आव्हाने पाहता या योजनेची अंमलबजावणी मिशन मोडवर करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी'चे सुधारित स्वरूप निश्चित करण्यासाठी महानिर्मिती, महावितरण व महापारेषण कंपनी, महाऊर्जा तसेच पीडब्ल्यूसी संस्था यांच्या प्रतिनिधींचा एक अभ्यासगट प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आला. या अभ्यासगटाने विविध शिफारसी आणि मिशन २०२५ संदर्भात प्रयास संस्थेचा अहवाल विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना दिवसा वीज पुरवठा करण्यसाठी तसेच कृषी फिडर्सचे सौर ऊर्जीकरण मिशन मोडमध्ये करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला.

या अभियानामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' अधिक सक्षम आणि सुव्यवस्थित करणे, सन २०२५ पर्यंत कृषी वीज वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी तांत्रिक, आर्थिक कार्यपद्धती आणि देखरेखीचा आराखडा तयार करणे आणि शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा करणे आणि किमान ७ हजार मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करणे, ही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली.

या अभियानांतर्गत विकेंद्रित प्रकल्प आस्थापित करण्यासाठी वीज उपकेंद्रांच्या परिघातील जमिनीची उपलब्धता, ग्रीड कनेक्टिव्हिटी आणि प्रकल्पाचे आकारमान हे महत्त्वाचे घटक आहेत. हे घटक परिस्थितीनुरूप बदलत असतात. यासाठी काही तरतुदींचा अवलंब करण्यात आला. जसे ०.५ ते १० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ११ केव्ही/२२ केव्ही स्तरावर जोडणे, ५ ते २५ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून ते ३३ केव्ही स्तरावर जोडणे, ग्रीड कनेक्टीव्हिटी उपलब्ध असल्यास उजनी, जायकवाडी व इतर जलाशयांवर व्यवहार्यतेच्या अधीन राहून १० ते ५० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प ११ केव्ही / २२ केव्ही / ३३ केव्ही स्तरावर जोडणे, प्रकल्प समूह तयार करणे अशा विविध तरतुदींचा अवलंब करण्यात आला. या अभियानासाठी पडीक जमिनीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी वीज उपकेंद्रापासून जवळच्या परिघातील खाजगी जागा निश्चित करून सौर ऊर्जा प्रकल्पास उभारण्यास द्यावी, असे ठरविण्यात आले. यासाठी प्रकल्पासाठी शासकीय जमिनी नाममात्र रूपये एक या दराने ३० वर्षाच्या कालावधीकरिता भाडेपट्याने आणि पोटभाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत खाजगी जमीन भाडेपट्ट्यावर घेताना त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किमतीच्या ६ टक्के दरानुसार परिगणीत केलेला दर किंवा प्रतिवर्ष १ लाख २५ हजार रूपये प्रती हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दर म्हणून गृहीत धरण्यात आला. अशा प्रकारे प्रथम वर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दरावर प्रत्येक वर्षी ३ टक्के सरळ पद्धतीने वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्पांतर्गत प्रकल्पाची क्षमता कमी असल्यामुळे प्रकल्प आस्थापनेचा खर्च वाढतो व प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता कमी असते. तरीही कृषी क्षेत्रात सौर ऊर्जा उपलब्ध करून देण्याची गरज लक्षात घेता अशा प्रकल्पांना चालना देण्यासाठी विकासकांना प्रोत्साहनात्मक आर्थिक सहाय्य देण्याचे ठरले. तसेच या अभियानात भाग घेणाऱ्या विकासकांना नाबार्ड, इरेडा, सार्वजनिक बँकाकडून माफक दराने प्रकल्प निधी मिळण्यासाठी शासनाने आवश्यक ती मदत केली. शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याचे अभियान हे महत्त्वाकांक्षी अभियान असल्याने नोडल एजन्सी, महावितरण, महापारेषण, महानिर्मिती, स्वतंत्र यंत्रणा, महाऊर्जा, प्रकल्प विकासक, स्थानिक प्रशासन, शेतकरी यांचे एकत्रित प्रयत्न झाले. यासाठी उपमुख्यमंत्री आणि उर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. अभियानाची यशस्वी व जलदगतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली. या अभियानाचा फायदे पाहता, या अभियानामुळे औद्योगिक व व्यावसायिक वीज ग्राहकांवर आकारण्यात येणारी क्रॉस सबसिडी कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांच्या वीज दरात कपात, राज्याच्या विविध जिल्ह्यात मोठी गुंतवणूक आणि ग्रामीण भागात पूर्णवेळ आणि अर्धवेळ रोजगार निर्मिती होत आहे. महावितरण व महापारेषण कंपनीची वितरण प्रणाली सुद्धा बळकट झाली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना योग्य त्या भाराने वीज पुरवठा होण्यास मदत झाली. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भाडेपट्ट्याने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना २५ वर्षाच्या कालावधीकरिता शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला आणि राहणीमानाचा दर्जा व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत झाली. त्याचबरोबर सामाजिक फायदा सुद्धा झाला आहे.

**– संजय डी.ओरके, विभागीय संपर्क अधिकारी (ऊर्जा)**

# मतदार यादीत नाव नोंदणीसह तपशील अद्ययावत करण्याचे आवाहन

राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने राज्यात यावर्षीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुन:रीक्षण कार्यक्रम घोषणा झाली आहे. यात मतदार दावे आणि हरकती २० ऑगस्ट २०२४ पर्यंत सादर करु शकतात. या कार्यक्रमातंर्गत पात्र नवमतदारांच्या नोंदणीसह विद्यमान मतदारांसाठी मतदार यादीतील आपल्या तपशीलांमध्ये बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करण्याची संधी उपलब्ध आहे. सर्व मतदारांनी आपले मोबाईल क्रमांक मतदार यादीतील आपल्या नावासोबत जोडून घ्यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धीपत्राद्वारे केले आहे. मतदार यादीत आपला मोबाईल क्रमांक जोडल्याने भारत निवडणूक आयोगाकडून मतदारांसाठी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना आणि निर्देशांची माहिती मतदारांना सुलभतेने मिळणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्यावतीने राबवले जाणारे मतदार सर्वेक्षणासारखे उपक्रम, मतदारांचे नाव मतदार यादीतून वगळण्या संदर्भातील अर्जावरील कार्यवाही याबाबतच्या सूचना - नोटीसा, पंचनाम्याची सूचना (असेल तर) प्राप्त होते, आणि संभाव्य कार्यवाही सुलभ होते. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या संकेतस्थळाद्वारे तसेच Voter Helpline ॲपद्वारे मतदार यादीतील आपल्या नावाचा सुलभतेने शोध घेता येतो. त्यासोबतच मतदारांना आपले ई-मतदार ओळखपत्र ही सहजतेने डाऊनलोड करता येते.

**मोबाईल क्रमांक एकाच मतदाराच्या अर्जासोबत जोडणे**

एका मोबाइल क्रमांकाचा वापर फक्त एकाच मतदार ओळखपत्रासाठी केला जावा. त्यामुळे विद्यमान मतदारांसह ज्यांच्या मतदार यादीतील नावासोबत त्यांचा विशिष्ट, अर्थात युनिक मोबाईल क्रमांक जोडलेला नाही, त्यांनी अर्ज क्र. ८ भरून आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडून घेणे मतदारांच्या हिताचे आहे, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्यासाठीचे पर्याय : १) नव मतदार नोंदणीचा अर्ज भरताना- नव मतदार नोंदणीचा अर्ज भरताना आपल्याला अर्जात स्वतःचा मोबाईल क्रमांक देण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. त्याचवेळी आपण इतर कोणत्याही मतदार ओळखपत्रासाठी वापरला न गेलेला असा स्वतःचा मोबाईल क्रमांक दिला तर तो मतदार यादीत आपल्या नावासोबत जोडला जातो.

२) विद्यमान नोंदणीकृत मतदारांसाठी अर्ज क्र. ८ - भारत निवडणूक आयोगाच्या मतदारांकरता असलेल्या अर्ज क्र. ८ मध्ये मतदार यादीतील वैयक्तिक तपशीलांमधील बदल, दुरुस्त्या आणि अद्ययावतीकरणा अंतर्गत मतदार यादीत आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्याचा पर्याय दिला आहे. हा अर्ज ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने भरता येतो. ऑनलाईन अर्ज भरण्याकरता www.voters.eci.gov.in हे संकेतस्थळ किंवा Voter Helpline हे मोबाईल ॲप वापरता येते. या संकेतस्थळावर लॉगीन केल्यावर अर्ज क्रमांक ८ निवडून, त्यात Correction of Entries in Electoral Roll या सुविधे अंतर्गत, आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडण्याचा पर्याय मिळतो. Voter Helpline App च्या होम पेजवरील Search Your Name In Electoral Roll हा पर्याय निवडला की, वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्रावरील बारकोड किंवा क्यूआर कोड आणि मतदार ओळखपत्र क्रमांक या माहितीच्या आधारे मतदार यादीत आपले नाव शोधण्याचे पर्याय दिसतात. voters.eci.gov.in या संकेतस्थळावर वैयक्तिक तपशील, मतदार ओळखपत्र क्रमांक आणि मतदार यादीतील आपल्या नावासोबत जोडलेला युनिक मोबाइल नंबर या माहितीच्या आधारे मतदार यादीत आपलं नाव शोधण्याचे पर्याय दिसतात. आपण एसएमएसद्वारे देखील मतदार यादीत आपले नाव तपासू शकतो. त्यासाठी आपल्या मोबाइलवरून एउख स्पेसमतदान ओळखपत्र क्रमांकहा मेसेज १९५० या क्रमांकावर पाठवावा लागतो. ऑफलाईन अर्ज भरण्यासाठी मतदार जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन, तसेच विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमादरम्यान आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष शिबिरांमध्येही ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरू शकतील.

**मतदार यादीत नाव तपासणे का गरजेचे**

नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर पोहोचल्यावर मतदार यादीत आपले नाव शोधतात. त्यांचे नाव मतदार यादीत आढळले नाही की, ते मताधिकाराला मुकतात. बऱ्याचदा मतदार त्यांनी आधीच्या निवडणुकीत ज्या मतदान केंद्रावर मत दिले होते, तिथेच आपले नाव असेल, असे गृहीत धरून त्याच मतदान केंद्रावर जातात. मात्र मतदान केंद्रांच्या पुनर्रचनेत त्यांचे नाव दुसऱ्या मतदान केंद्रावर गेलेले असू शकते. या माहितीच्या अभावामुळेही मतदार यादीत आपले नाव नाही, असे समजून ते मतदानाला मुकतात.

मतदार ओळखपत्रात नाव, लिंग, जन्मतारीख, मोबाइल क्रमांक इ. वैयक्तिक तपशिलांत चुका असल्यास त्यात दुरुस्ती करण्यात यावी, मतदाराला असे ओळखपत्र एखाद्या ठिकाणी पुरावा म्हणून देण्यास अडचण येऊ शकते, म्हणून त्यांनी हे बदल करून घेतले पाहिजेत. दुसर महत्वाच म्हणजे मतदानाच्या वेळीही ओळख पटवण्यासाठी ते अडचणीचं ठरू शकतं त्यामुळेही हे बदल करून घेणे आवश्यक असतं. जेणेकरून मतदार यादीत आपले नाव नसेल तर आपण मतदार नोंदणीचा अर्ज भरू शकतो, तसेच आपल्या वैयक्तिक तपशिल अथवा पत्त्यात बदल, दुरुस्त्या, अद्ययावतीकरण करायची गरज असेल तर त्यासाठीचे अर्जही वेळेत भरू शकतो. आपण आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधू शकता आणि त्यांनाही मतदार यादीतील आपल्या नावासोबत मोबाईल क्रमांक जोडून देण्याची विनंती करू शकता, असे अवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# ४ वर्षांपासून फरार बलात्कारातील आरोपीला हरिद्वार येथून अटक




**नालासोपारा/प्रतिनिधी**

मागील ४ वर्षांपासून बलात्कार या गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या आरोपीला उत्तराखंडच्या हरिद्वार येथून अटक करण्यात गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती पोलीस निरीक्षक अभिजित मडके यांनी शुक्रवारी दिली आहे. नालासोपाऱ्याच्या यशवंत गौरव परिसरात राहणाऱ्या १९ वर्षीय तरुणीवर आरोपी अनिल बिडलान याने १६ जुलै २०२१ रोजी संध्या. ७ वाजण्याच्या सुमारास एकटी घरी असताना तोंड दाबून जीवे ठार मारण्याची धमकी देऊन लैंगिक अत्याचार केला होता. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त आणि सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी पोलीस आयुक्तालयातील गंभीर गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना व आदेश दिला होता. गुन्हे शाखेच्या युनिट तीनच्या पोलिसांनी बलात्काराच्या गुन्ह्यात फरार असलेला आरोपी हा उत्तराखंडच्या हरिद्वार येथे आपले अस्तित्व लपवून राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. यानंतर पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन आरोपी अनिल बिडलान याला हरिद्वार येथून ताब्यात घेतले. पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस हजर करण्यात आले आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त मधुकर पांण्डेय, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोउपनिरी उमेश भागवत, पोहवा अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, मुकेश तटकरे, बागर बारवकर, अश्विन पाटील, राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, मसुब प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे तसेच सायबर सेलचे संतोष चव्हाण यांनी पार पाडली आहे.

# टिटवाळ्यात बॅगेत आढळला वृद्धाचा मृतदेह

**ठाणे/प्रतिनिधी**

दादर रेल्वे स्थानकात एका सुटकेसमध्ये तरुणाचा मृतदेह आढळल्याची घटना ताजी असतानाच ठाणे जिल्ह्यातील टिटवाळ्यातही असाच धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कल्याण तालुक्यातील वरप गावात निर्मनुष्य ठिकाणी फेकलेल्या बॅगेत एका ज्येष्ठ नागरिकाचा मृतदेह सापडला. त्याचं वय ६५ ते ७० वर्ष वयोगटातील असण्याची शक्यता असून वृद्धाची अद्याप ओळख पटलेली नाही. कल्याण तालुका ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात हत्या आणि पुरावा नष्ट केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आता पोलिसांनी तपास सुरू केला आहे. कल्याण तालुक्यातील वरप गावातील एका रहिवाशाने ही सुटकेस पाहून स्थानिक कल्याण तालुका पोलिसांना माहिती दिल्याने ही घटना उघडकीस आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून फॉरेन्सिक टीमसमोर बॅग उघडली. यात एका पुरुषाचा मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत



सापडल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी अज्ञातांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ ऑगस्टच्या सकाळीच कल्याण-मुरबाड मार्गावरील वरप गावात उघड्या जमिनीवरील कचरापट्टीजवळ लघुशंकेसाठी आलेल्या एका व्यक्तीला निळ्या रंगाची सुटकेस सापडली. त्याने ती उघडून पाहिली तेव्हा त्याला दरदरुन घाम फुटला. त्यात या ज्येष्ठ नागरिकाचा मृतदेह आढळून आला. त्याने तात्काळ पोलिसांना या घटनेची माहिती दिली. या मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी परिसरातील तसेच कल्याण- मुरबाड मार्गावरील शंभरहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज पोलीस तपासून पाहत आहेत. घटनास्थळी श्वान पथक आणि ठाणे गुन्हे शाखेचे पथकही दाखल झाले आहे. मृतदेहाची ओळख पटवणे आणि आरोपीचा शोध घेणे असे दुहेरी आव्हान पोलिसांसमोर असून त्यांनी समांतर तपास सुरु केला आहे. दोन आठवड्यांपूर्वी दादर स्टेशनवरही सुटकेसमध्ये मृतदेह सापडला होता. मध्यरात्री दादर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्र. ११ वर एक तरुण तुतारी एक्सप्रेस पकडण्याच्या प्रयत्नात होता. मात्र हातातील बॅग अवजड असल्याने त्याला गाडीत चढता येत नव्हतं. त्याच्या मदतीसाठी स्थानकातला आरपीएफ जवान धावला. पण बॅगेला हात लावताच त्यावरचे रक्ताचे डाग पाहून या प्रकरणाचा उलगडा झाला.

# डॉ.नागोराव कुंभार यांची विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजारांची देणगी



**लातूर/प्रतिनिधी**

थोर विचारवंत, माजी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांनी लातूरच्या विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी देऊन गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य केले केल्याबद्दल त्यांचा मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. डॉ.नागोराव कुंभार यांनी त्रैमासिक विचारशलाकामधून लोकशाही, भारतीय संविधान, मानवी मूल्य जोपासण्याचे काम केले. तसेच शिक्षण क्षेत्रातही अनमोल कार्य केल्याची दखल घेवून सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेच्यावतीने समाजभूषण पुरस्कार देवून खा.शरद पवार यांच्या हस्ते नुकतेच सन्मानीत करण्यात आले होते.

या सन्मानाबद्दल विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.नागोराव कुंभार यांनी विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी दिली. या प्रसंगी मंडळाचे सचिव प्राचार्य डॉ.नागनाथ मोटे, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.कुसुमताई मोरे, कोषाध्यक्ष प्रा.बालाजी पळसकर, सहसचिव विक्रम कदम, संचालक प्रा.फ.म.शहाजिंदे, ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे, प्रा.सुधीर साळुंके आदि उपस्थित होते.

# भिवंडीत निजामपूर पोलिसांनी घेतला १०७ वाहनांच्या मूळ मालकांचा शोध

**भिवंडी/प्रतिनिधी**

पोलीस ठाणे परिसरात बघितला की त्या आवरता जुनी बेवारस वाहने हमखास दिसून येतात. ज्यामुळे पोलिस ठाणे परिसरात अडगळ म्हणून आढळणारी ही बेवारस वाहन चालकांचा शोध घेऊन त्यांना देण्यासंदर्भात पोलिस प्रशासनाने सूचना दिल्या नंतर निजामपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांनी सेवाभावी संस्थेच्या मदतीतून सुरवात केली असून तब्बल १०७ वाहन मालकांचा शोध घेतला आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांनी दिली आहे.



निजामपुरा पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयातील बेवारस व अपघातीतील एकुण १०७ वाहने पोलीस ठाणेच्या अवारात सन २००५ पासुन जमा आहेत. त्यामध्ये ८८ दुचाकी, १३ चार चाकी व ६ ऑटो रिक्षा यांचा समावेश आहे. ही सर्व वाहने पोलिस ठाणे परिसरात बेवारस अवस्थेत अनेक वर्षापासुन धुळखात पडुन असल्याने त्यामुळे आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण होत होती. ही बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध घेण्यासाठी तळेगाव दाभाडे, जि. पुणे येथील महाराष्ट्रात बेवारस वाहनांचा शोध घेण्यात अग्रेसर असलेल्या गंगामाता वाहन शोध संस्थेची मदत घेतली. या संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिपक शेलार, सपोनि चव्हाण, पोउपनिरी बडगिरे, मुद्देमाल कारकुन लोहार यांच्या मदतीने बेवारस अवस्थेत असलेल्या वाहनाची पाहणी करून वाहन नोंदणी क्रमांक, वाहनांचे चेसीस व इंजिन क्रमाकां तपासून दोनच दिवसात १०७ वाहनांच्या मुळ मालकांचा शोध लावला आहे. निजामपुरा पोलिसांकडून संबंधित वाहन मालकांना संपर्क साधून त्यांनी पोलिस ठाणे येथे येऊन आपले वाहन तपासुन घेवुन जावे असे आवाहन केले असून सदरचे वाहन मालकांनी ताब्यात न घेतल्यास कायदेशीर प्रक्रीया पुर्ण करून त्यांचा लिलाव केला जाईल व त्यातुन आलेली रक्कम सरकारी तिजोरीत जमा करण्यात येईल अशी माहिती शेवटी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांनी दिली आहे. वाहन मालकांचा शोध घेण्यासाठी सर्वप्रथम वाहनाचे चेसीस व इंजीन नंबर यांची यादी केली जाते. त्यानंतर वाहनाची विभागणी करून बेवारस, अपघात व गुन्हयातील वाहने अशी वर्गवारी करून मुळ मालकाचा घराचा पत्ता शोधला जातो. अनेकदा वाहन मालकाचा जुना पत्ता नोंद असल्याने मालक त्या पत्यावर मिळुन येत नाही, अशा वेळी वाहनाची बारकाईने माहिती गोळा करून मुळ मालकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जातो अशी माहिती गंगामाता वाहन शोध संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी दिली आहे.

# सोलापूर जिल्हा परिषद येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानामध्ये ७८वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर मनिषा आव्हाळे यांनी सर्व विभाग प्रमुख, अधिकारीवर्ग व कर्मचारी यांना स्वतंत्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्यालयात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), अमोल जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, पशुसंवर्धन अधिकारी नवनाथ नरळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख यांच्यासह सर्व विभाग प्रमुख अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# तेरा भाई अब ट्रेन चलाएगा! मोटारमॅनच्या डब्यात रीलस्टारचा धिंगाणा, पोलिसांनी दाखवला हिसका!

**कसारा/प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या कसारा रेल्वे स्थानकात चार नंबर फलाटावर उभ्या असलेल्या लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून रील शूट करून त्याचा व्हिडिओ, इंस्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअॅप एपग्रुपवर व्हायरल करणाऱ्या दोन रीलस्टारला रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी नाशिकमधून अटक केली आहे. राजा हिम्मत येरवाल (२०), रितेश हिरालाल जाधव (१८) अशी अटक रीलस्टार आरोपींची नावे आहेत. ते दोघेही नाशिक येथील रहिवासी आहेत. रेल्वे सुरक्षा बळातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या दहा दिवसापूर्वी कसारा रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक चारवर उभ्या असलेल्या कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये बेकायदा घुसून आरोपी राजा आणि रितेश यांनी मोबाईल कॅमेऱ्यात एक रील तयार करण्यासाठी व्हिडिओ शूट केला होता. या रिलच्या व्हिडीओमध्ये ते मोटरमन असल्यासारखे आणि तेथील यंत्रणेची हाताळणी करत होते. शिवाय लोकल सुरू करण्याचा फाजील अभिनय करत असून मित्रांना मागील डब्ब्यात मध्ये बसण्याचे सांगत आहे. तसेच तुम्हारा भाई अब ट्रेन चलाएगा असे बोलून दुसरा आरोपी म्हणतो तुझे बाईक चलाना नही आता



तू क्या लोकल चलाएगा! असे बोलणाऱ्या मित्राच्या गालात चापट मारतानाचा व्हिडिओ या दोन रीलस्टारने सोशल मीडियावर व्हायरल केला होता. हाच व्हायरल व्हिडिओ रेल्वे सुरक्षा बाळाच्या पथकाला मोबाईलमध्ये दिसताच त्यांनी या घटनेची गंभीर दखल घेत कसारा वरिष्ठ मंडळ सुरक्षा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली कसारा आरपीएफचे निरीक्षक एम.के, सौनी यांनी लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून हाच व्हिडीओ तयार करण्यात आल्याने रेल्वेच्या सायबर सुरक्षा विभागाने समाज माध्यमांतील या व्हायरल व्हिडिओच्या अनुषंगाने आरोपींचा तपास सुरू केला होता. कसारा रेल्वे स्थानकांमधील सीसीटीव्ही चित्रण, इतर तांत्रिक माहितीच्या आधारे रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी या दोन्ही तरूणांची ओळख पटवली. ते नाशिक येथील रहिवासी असल्याचे समजले. रेल्वे सुरक्षा बळ आणि स्थानिक पोलिसांनी नाशिकमध्ये या तरूणांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली. हे दोन्ही तरूण नाशिकमधून अटक केले. या तरूणांनी कसारा रेल्वे स्थानकातील कसारा लोकलच्या मोटरमन केबिनमध्ये घुसून बेकायदा चित्रफित तयार केल्याची कबुली रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांना दिली. पोलिसांनी त्यांच्या दोषारोप ठेऊन त्यांना ८ ऑगस्ट रोजी अटक केली. असाच प्रकार यापूर्वी गुलजार शेख याने करून रेल्वे रुळाशी छेडछाड केली होती. त्यालाही अटक करण्यात आली आहे.रेल्वेच्या आवारात, लोकलमध्ये कोणीही गैरकृत्य करत असेल तर त्याने १३९ किंवा ९००४४१०७३५ वर संपर्क साधण्याचे आवाहन रेल्वे सुरक्षा जवानांनी केले आहे.

# मद्यपी वाहन चालकावर कारवाई केल्याने वाहतूक पोलिसाला केली बेदम मारहाण!

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी येथे मद्यपी वाहन चालकावर कारवाई केल्याने पोलीस नाईक संतोष गोड यांना पाच जणांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी एकाला अटक केली आहे. भिवंडी शहर वाहतुक उपशाखेचे पोलीस नाईक संतोष गोड हे सोमवारी मद्यपी चालकांविरोधात कारवाई करत होते. सोमवारी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास एक दुचाकी त्याठिकाणी आली. पोलिसांनी त्या दुचाकीस्वार आणि त्याच्या सहकाऱ्याला अडविले. त्यांनी मद्याचे सेवन केले आहे का, हे तपासण्यासाठी त्यांना कार्यालयात नेण्यात आले. श्वास विश्लेषक यंत्राद्वारे (ब्रेथ नालायझर) तपासणी केली असता, त्यांनी मद्याचे सेवन केल्याचे स्पष्ट झाले. त्यांची दुचाकी कल्याणनाका येथे उभी असल्याने संतोष गोड हे दुचाकीस्वाराच्या सहकाऱ्यासोबत ती दुचाकी आणण्यासाठी तेथे गेले. त्याचवेळी चारजण एका मोटारीतून त्याठिकाणी आले. तसेच का कारवाई केली अशी विचारणा त्यांनी संतोष यांना केली. संतोष गोड यांनी त्यांना बाजूला होण्यास सांगितले. त्यावेळी झालेल्या वादातून मोटारीतील चार जण आणि दुचाकी स्वाराच्या सहकाऱ्याने संतोष गोड यांना शिवीगाळ आणि मारहाण केली. दरम्यान संतोष यांनी त्यांच्या सहकाऱ्याला मदतीसाठी बोलावले. तसेच मारहाणी दरम्यान संतोष यांनी मारहाण करणाऱ्यांपैकी प्रदीप कोकूल याला पकडले. संतोष यांचे सहकारी येत असताना मारहाण करणारे पळून गेले. याप्रकरणी पाचही जणांविरोधात भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी प्रदीप याला अटक केली आहे. तर त्याच्या इतर साथीदारांचा पोलीस शोध घेत आहेत. याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# स्व.पंडित नाना मित्र मंडळ गणेशोत्सव मंडप भूमिपूजन संपन्न



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील कामात घर येथील चंदन बाग चा राजा म्हणून गौरविल्या गेलेल्या स्व.पंडित नाना मित्र मंडळ तर्फे दरवर्षी भव्यदिव्यतेने गणेशोत्सव देखावे साजरा होत आहे.यंदा सार्वजनिक गणेशोत्सवाचे ३५ वे वर्ष असून या वेळी नेपाळ येथील पशुपतिनाथ देवस्थान मंदिरचा देखावा साखरला जाणार आहे. या देखावा मंडपाचा शुभारंभ संस्थापक साईनाथ पवार यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करून करण्यात आला. भव्यदिव्य असा हुबेहूब ८० फूट उंचीचा व यात १२ फुटाचा नांदी देखील उभारण्यात येणार आहे. या गणेशोत्सव काळात विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन यावेळी केली जाणार आहे

# हत्या करून फरार आरोपीला सहा वर्षांनी तुळींज पोलिसांनी अखेर ठोकल्या बेड्या!

**नालासोपारा/प्रतिनिधी**

तरुणाच्या हत्येच्या गुन्ह्यातील ६ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अटक करण्यात तुळींज गुन्हे प्रकटीकरणच्या पोलिसांना यश मिळाल्याची माहिती पोलीस निरीक्षक अभिजित मडके यांनी शुक्रवारी दिली आहे. मोरेगावच्या मौर्या नगर येथील नागरिक कॉलनीत राहणाऱ्या प्रवीण उर्फ सोनू साखरिया (२२) याची ३ मे २०१८ रोजी हत्या करण्यात आली होती. त्याची कोणत्यातरी हत्याराने डोक्यात तसेच तोंडावर मारून गंभीर जखमी करत हत्या केलेला मृतदेह ९० फुटी रोडच्या कडेला मिळाला होता. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचे तपासात आरोपी भरत राय (२५), आशिष कुलकर्णी (२१), निशांत मिश्रा ऊर्फ मोनु रायडर (२९) आणि प्रिन्स सिंग ऊर्फ पोगो यांनी केला असल्याचे तपासात निष्पन्न केले होते. या गुन्ह्यात पोलिसांनी भरत, आशिष आणि निशांत या तिघांना तात्काळ अटक केली होती. पण गुन्हा घडल्यापासून आरोपी प्रिन्स हा फरार होता. याचा शोध घेऊन अटक करण्यासाठी वरिष्ठांनी आदेश दिले होते. तेव्हापासून पाहिजे आरोपी हा त्याचे अस्तित्व लपवून विरार, अंबरनाथ, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई येथे वास्तव्य करत असल्याचे बातमीदाराकडून माहिती प्राप्त झाली होती. या आरोपीचा माग काढत असताना गुरुवारी संध्याकाळी विरार कातकरी पाडा येथे असल्याची माहिती सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवानंद सुतनासे यांना मिळाली होती. वरिष्ठांना माहिती देऊन सदर ठिकाणी तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी सापळा रचून आरोपी प्रिन्सला ताब्यात घेतले. या गुन्ह्यात त्याचा सहभाग निष्पन्न झाल्यावर शुक्रवारी आरोपीला अटक केले आहे. सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले श्रींगी, सहाय्यक पोलीस आयुक्त




उमेश माने-पाटील, तुळींजचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सुनील पाटील, सपोउनिरी शिवानंद सुतनासे, पोलीस हवालदार आनंद मोरे, उमेश वरठा, राजेंद्र जाधव, अशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, इस्माईल छपरीबन, राहुल कदम, शशिकांत पोटे, बागुल, अमोल बर्डे यांनी केली आहे.

19 TO 25 AUGUST 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 8/17/2024 8:06 PM Page 1



# उच्चशिक्षित सरपंच दिनेश कोदे यांना राष्ट्रीय उत्कृष्ट पुरस्कार



**वाडा/प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ पुणे व नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने व ऑल इंडिया युथ फाऊंडेशन टिम झेन्थ आणि इंडियन गॅलेक्सी फाऊंडेशन नवी दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त नवी दिल्ली येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय उत्कृष्ट सरपंच पुरस्काराने ग्रामपंचायत सारशीचे लोकनियुक्त व उच्चशिक्षित असलेले सरपंच दिनेश सुनिता काळुराम कोदे यांना सन्मानित करण्यात आले. दिनेश कोदे यांना त्यांच्या सर्वागीण विकासाच्या दूरदृष्टीची व सामाजिक कार्याची दखल घेऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाचा पुरस्कार वितरण समारंभ सोमवारी (दि. १२ ऑगस्ट) भारती विद्यापीठ नवी दिल्ली येथे पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे समाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, राज्य वाणिज्य आणि उद्योग मंत्री हर्ष मल्होत्रा, डॉ. आंबेडकर ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. मनीष गवई भारती विद्यापीठ नवी दिल्ली संचालक प्रो. एम.एन होडा आदी उपस्थित होते. दिनेश कोदे यांना राष्ट्रीय उत्कृष्ट सरपंच पुरस्काराने सन्मानित केल्याने सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'राजमाता जिजामाता'त गुणवंतांचा गौरव




**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज व संगमेश्वर विद्यालयात ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा के.ए. जायेभाये होत्या. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे व वैशाली केंद्रे, संस्थेच्या सदस्य स्वाती घुले, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे, प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी विविध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या माहिती सांगून स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# अवैध मद्य तस्करी करणाऱ्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई




**डहाणू/प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने ड्राय डे असल्यामुळे अवैध मद्य तस्करीवर आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने दिवसरात्र गस्त आणि करडी नजर ठेवली आहे. या मोहिमेअंतर्गत विभागाने एक महत्त्वपूर्ण कारवाई करत १३ लाखांहून अधिक किमतीचा अवैध मद्याचा साठा जप्त केला. मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे, मौजे चिल्लार फाटा, मुंबई–अहमदाबाद हायवेवर, एक पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी ब्रिझा गाडी थांबवून तपासणी करण्यात आली. गाडीमध्ये दादरा नगर हवेली राज्यात विक्रीसाठी नेण्यात येणारे ५० बॉक्स विदेशी मद्य आढळून आले. या मद्याची एकूण किंमत १३,१९,६००/– रुपये असल्याचे स्पष्ट झाले. सदर कारवाईत गाडीचा चालक फरार झाला असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त प्रदीप पवार, अधीक्षक सुधाकर कदम आणि उपअधीक्षक बी.एन. भुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निरीक्षक सुनील देशमुख, अरुण चव्हाण, दुय्यम निरीक्षक विश्वजीत एम. आभाळे आणि त्यांच्या संपूर्ण टीमने ही धडक कारवाई केली.

# स्वतंत्र्य दिनानिमित्त केळवा पोलिसांचे रक्तदान शिबीर संपन्न

**सफाळे/एच. लोखंडे**




भारतीय स्वतंत्र्याच्या ७८व्या स्वतंत्र दिवसाच्या निमित्ताने आणि बाळासाहेब पाटील पोलीस अधीक्षक पालघर यांच्या संकल्पनेतून जनसंवाद अभियान अंतर्गत केळवा सागरी पोलीस ठाणे व रोटरी क्लब केळवा, रोटरी क्लब ऑफ पालघर, इनर व्हील क्लब ऑफ पालघर, शितलादेवी व हनुमान मंदिर ट्रस्ट केळवा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कच्छ युवक संघ मेडिकल पालघर, व जे जे ब्लड बक यांच्या सौजन्याने दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी शितलाई मंगलधाम हॉल केळवा येथे रक्तदान शिबीर आयोजित करून संपन्न करण्यात आले आहे. सदर शिबीर संदर्भात केळवा पोलीस ठाणे प्रभारी पोलीस अधिकारी दत्ता शेळके सापोनी आणि कार्यरत पोलीस कर्मचारी यांनी केळवा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या विभागातील गावे – खेडे– पाडा येथील नागरिक यांना. जनसंवाद अभियान यांच्या माध्यमातून. जनजागृती करीत, रक्तदानांचे महत्त्व पटवून दिलेले. या अनुषंगाने रक्तदान शिबिरासाठी, तरूण, तरूणी, महिला वर्ग शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते. त्यातील प्रत्यक्ष ४४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. रक्तदान शिबिराला बाळासाहेब पाटील पो. अधिक्षक पालघर, अभिजीत धाराशिवकर–उपविभागीय पो. अधिकारी पालघर, सफाळे पो. ठाणे प्रभारी पो. अधिकारी अविनाश मांदळे पो. निरीक्षक यांनी भेट देऊन रक्तदात्यांना प्रोत्साहन दिले. निलेश रमेश राऊत शिवसेना वैद्यकीय कक्ष– पालघर जिल्हा प्रमुख व पालघर जिल्हास्तरीय शांतता कमिटी सदस्य, तसेच मित्र फाऊंडेशन पालघरचे पदाधिकारी जेष्ठ पत्रकार मा.हिरालाल लोखंडे, जगदीश पाटील, माजी सरपंच कांद्रेभुरे, हरीश वझे, पोलीस मित्र सांबरे जी आदींनी, उपस्थित रक्तदात्यांना प्रोत्साहन देत, त्यांचे आभार मानले. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी केळवा येथील तरूण तडफदार युवा वर्ग, मच्छिमार बांधव, केळवा सा. पो. ठाणे प्रभारी पो. अधिकारी श्री दत्ता शेळके सपोनि. पोलीस ठाण्यातील कार्यरत कर्मचारी, अंमलदार यांनी नियोजना करून रक्तदान शिबीर संपन्न केले आहे. याबद्दल परीसरातील नव्हे तर जिल्ह्यातून शिबीर आयोजक, सहकारी, रक्तदाते यांचे गोड कौतुक होत आहे.

## मयत अनोळखी इसमाबाबत पोलिसांचे आवाहन



विरार : विरार पोलीस स्टेशन मनुष्य मिसिंग रजि. नं. १६५/२०२४ मधील खबर देणार आतेश राजेश दुबे राहणार नालासोपारा (पूर्व) यांनी दि. ५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी खबर दिली की, यातील मयत अनोळखी पुरुष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे हा बेशुद्ध अवस्थेत आढळला आहे. पोलिसांनी तत्काळ घटलास्थळी धाव घेऊन त्यास उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय, विरार (पश्चिम) येथे दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यास तपासून दाखलपूर्व मयत घोषित केले. ह्या अनोळखी मयत इसमाचा तपास होण्यासाठी मयत इसमाचा फोटो आणि माहिती सोबत दिली आहे. हा अनोळखी इसम कोणत्यातरी अज्ञात आजाराने ग्रासला असावा असा कयास आहे. मयत इसमाच्या उजव्या हातात पिवळ्या रंगाच्या धातूचे कडे असून हाताच्या मनगटावर ओम असे गोंडलेले आहे. तसेच डाव्या हातावर स्पोर्ट्सचे घड्याळ आहे. डोक्यावर दाट केस व चेहऱ्यावर दाढी मिशी आहे. या बेवारस अनोळखी मृत व्यक्तीस कुणी ओळखत असल्यास विरार पोलीस ठाण्यास मोब. नंबर ९४२३७६४९१३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. पुढील तपास विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विशाल तवटे हे करीत आहेत.

पान १ वरून....

## सत्य लपवण्याची अंगाशी आली...

हत्या केली आहे. घोडबंदर रोड परिसरातील दोस्ती एम्पेरियाजवळ असणाऱ्या एमएमआरडीए इमरतीमध्ये राहणाऱ्या २३ वर्षीय दिलशान इम्रान याने रेश्मा नावाच्या महीलेबरोबर लग्न केलं होत. रेश्माचे हे दुसरे लग्न होते. तिला पहिल्या नवऱ्यापासून आर्यन नावाचा पाच वर्षाचा मुलगा होता. मुलगा असल्याचे रेश्माने दिलशान पासून लपवले होते. मात्र त्यानंतर रेश्मा आर्यनला दिलशान आणि ती राहत असलेल्या घरी घेऊन आली. मात्र या घटनेचा दिलशान याला प्रचंड राग आला. त्यामुळे तो आर्यनचा राग राग करू लागला.

याच रागातून त्याने २८ जुलैला सायंकाळी साडेसात वाजण्याचा सुमारास आर्यनचा गळा पकडून त्याला लोखंडी सोफ्यावर आपटले. यामध्ये आर्यनच्या मणक्याचे हाड तुटले आणि पोटात देखील रक्त साखळले. त्यानंतर आर्यनला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान आर्यनचा मृत्यू झाल्याने दिलशान याच्यावर चितळसर मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास मानपाडा पोलीस करत आहेत अशी माहिती परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त अमरसिंग जाधव यांनी दिली.

## शुल्लक कारणावरून चिडला फार...

करिता रवाना केला. या प्रकरणी एम एच बी कॉलनीपोलिसांनी अवधेश कुमार फुलुराम यादव रा. गणपत पाटील नगर, न्यू लिंक रोड बोरवली (पश्चिम) याने दिलेल्या फिर्यादीवरून गु.र. क्रमांक ४४५/२०२४, कलम, १०३, (१)११८, (२)३ ५२,११५, भा, न्या, स, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन परिमंडळ, ११ पोलीस उप आयुक्त आनंद भोईटे सहाय्यक पोलीस आयुक्त, (बोरीवली विभाग, मुंबई,)सुनील जायभाये, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सुधीर कुडाळकर, पोलीस निरीक्षक( गुन्हे) सचिन शिंदे, पोलीस निरीक्षक किरण सुरसे, यांनी ताबडतोब घटनास्थळी भेट देवुन घडलेल्या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून गुन्हे प्रकटीकरण पोलीस पथकास तपासासबंधी मार्गदर्शन करुन कारवाई करण्याकरीता त्वरीत सुचना देण्यात आल्या.

त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पोलीस पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक संदीप गोरडे, व सहकारी पोलीस पथक यांनी संशयित आरोपी विषयी परिसरात अंतर्गत माहिती प्राप्त केली. तसेच त्याचा मोबाईल नंबर व फोटो प्राप्त केला. व तांत्रिक माहितीच्या आधारे तपास करुन मोस्ट कॉलर चे मोबाईल नंबर हस्तगत केले. त्यापैकी एक मुंबईतील व एक हैदराबाद येथील मोस्ट कॉलर चा मोबाईल क्रमांक मिळाला. मुबई येथील मोस्ट कॉलरचा शोध घेवुन त्याच्याकडून पाहिजे आरोपी विषयी अधिक माहिती प्राप्त केली. त्यानतंर माहिती मिळाली की आरोपी हा गुन्हा केल्यानंतर ताबडतोब हैदराबाद येथे पळून गेला.

आरोपीचा शोध घेण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप गोरडे व पोलीस पथक यांचे एक पथक तयार करून खाजगी वाहनाने ते हैदराबाद येथे रवाना झाले .पोलीस पथक हैदराबाद शहरात दाखल झाल्यानंतर सलग १५ तास प्रवास करुन कोमपल्ली हैदराबाद येथील मोठ्या इंडस्ट्रीयल एरिया मध्ये आरोपीचा शोध घेवुन त्या ठिकाणी गुप्त सापळा रचला .पोलिसांनी आरोपी दिसताच त्याला अलगद ताब्यात घेतले. त्यानंतर तात्काळ परतीचा २२, तास प्रवास करुन त्याला मुंबईत घेऊन आले.पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी केली असता, त्याने बहिणीचा खून का आणि कशासाठी केला? याबाबत सविस्तर माहिती दिली ती अशी! राजीव साह आणि त्याची बहीण चुनियादेवी राम विश्वास यादव हे दोघेही बहीण भाऊ गल्ली नंबर ४, गणपत पाटील नगर, न्यू लिंक रोड बोरवली पश्चिम याठिकाणी एकत्र राहत होते. चुनियादेवी ही घरकाम करत होती तर राजीव हा छोटे मोठे काम करत होता.मात्र दोघा बहीण भावामध्ये पटत नव्हते. घरातील क्षुल्लक कारणावरून त्यांच्यात खटके उडत होते. १ आगस्ट रोजी कोणत्यातरी कारणावरून या दोघा बहीण भावामध्ये वाद झाला. यातून तो बहिणीला शिवीगाळ करून हाताने मारहाण करू लागला. तसेच धारदार हत्याराने डोक्यात व इतर भागांवर वार करून बहिणीला जखमी केले तसेच घरात शिजत असलेला पातेल्यातील गरम गरम भात तिच्या हातावर फेकून दिला. तिचे दोन्ही हात भाजून ती गंभीर जखमी झाली. त्यानंतर राजीव साह घटनास्थळवरून पळून गेला.अशी धक्कादायक कबुली दिली. पोलिसांनी ४ आगस्ट रोजी राजीव साह याला अटक केली. ही यशस्वी कामगिरी परिमंडळ ११ चे पोलीस उप आयुक्त आनंद भोईटे ,सहाय्यक पोलीस आयुक्त, (बोरीवली विभाग, मुंबई,)सुनील जायभाये, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सुधीर कुडाळकर, पोलीस निरीक्षक( गुन्हे) सचिन शिंदे, पोलीस निरीक्षक किरण सुरसे,पोलीस उपनिरीक्षक संदीप गोरडे, पो.ह. प्रवीण जोपळे, संदिप परीट, सतीश देवकर, पोशि.अर्जुन आहेर.गणेश शेरमाळे, आदित्य राणे, (तांत्रिक मदत) यांनी पार पाडली.

पान ८ वरून....

## शासनाच्या महत्वकांक्षी योजनेच्या ...

आलेला असून दिनांक १ ते १५ ऑगस्ट या दरम्यान महसूल विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, कृषी मार्गदर्शन कार्यक्रम, महसूल जनसंवाद, सैनिक हो तुमच्यासाठी, आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, एक हात मदतीचा – दिव्यांगांच्या कल्याणाचा, महसूल अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण, महसूल पंधरवडा वार्तालाप इत्यादी उपक्रमांचा समावेश महसुल पंधरवडा मध्ये करण्यात आला. राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना नि:शुल्कपणे कार्यान्वित करण्यात आलेली असून जिल्हा प्रशासनामार्फत ३००० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे व त्यांना याबद्दल विद्यावेतन देखील अदा करण्यात येणार आहे. तरी नोंदणीकृत उमेदवार शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमधील रिक्त जागांकरिता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत इच्छुकांनी अर्ज सादर करुन सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत हवामानावर आधारित फळपीक विमा योजना (मृगबहार) चिकू करिता सन २०२३–२४ मध्ये २५४ शेतकऱ्यांच्या खात्यावर १२६.४४ लाख अनुदान जमा करण्यात आलेले आहे. याशिवाय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत सन २०२३–२४ मध्ये जिल्ह्यातील ६४ प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असून रुपये १ कोटी २८ लाख विमा अनुदान शेतकऱ्यांच्या वारसांना व कुटुंबियांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेले आहेत. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) कायदा २००६ अन्वये जिल्ह्यामध्ये ५१ हजार ६४९ वैयक्तिक तसेच ४९६ सामूहिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आलेले असून संपूर्ण राज्यामध्ये सर्वात जास्त वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करण्यात पालघर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. आपल्या आदिवासीबहुल पालघर जिल्ह्यातून अधिकाधिक खेळाडू तयार व्हावेत व प्रतिभावंत खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे या दृष्टिकोनातून मिशन लक्ष्यवेध मोहीम, शालेय क्रीडा स्पर्धा, रोडरेस, उन्हाळी क्रीडा स्पर्धा, सद्भावना दौड, मास्टर्स ट्रेनिंग इत्यादी क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले जाते. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत आधुनिक दर्जाची व्यायामशाळा तसेच क्रिडांगणे तयार करण्यासाठी सर्वसाधारण, आदिवासी, अनुसूचित जाती योजनेअंतर्गत ग्रामीण स्तरावरील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात येत आहे. याशिवाय जिल्हा क्रीडा संकुल निर्मितीसाठी १६ एकर जमिनीवर ४०० मीटरच्या आधुनिक सिंथेटिक ट्रॅकसह जलतरण तलाव, मल्टीपर्पज हॉल, क्रीडा वसतीगृह आणि विविध खेळांच्या अद्ययावत क्रिडांगणांनी युक्त असा हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर याचा लाभ जिल्ह्यातील सर्वच प्रतिभावान खेळाडूंना होणार आहे. भविष्यात पालघरसारख्या प्रगतशील जिल्ह्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तयार होतील असा विश्वास पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना धनादेशाचे वाटप पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कारही पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केला. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मनोर–वाडा राज्यमार्ग व वाडा भिवंडी राज्यमार्ग यांचे रस्तादुरुस्ती काम मंजूर असून केंद्रीय मार्ग निधीमधून केळवा स्टेशन ते केळवा दांडा रोड रुंदीकरण, चिंचारे, रावते, बोरशेती, किराट, नागझरी, निहे, काटाळे, मासवण, धुकटण, बहाडोली, दहिसर रस्ता रुंदीकरण इत्यादी मंजूर कामांना पावसाळ्यानंतर सुरुवात करण्यात येणार आहे. याशिवाय डहाणू कासा जव्हार रस्ता सुधारणा करण्याचे काम नियोजित असून डहाणू ते चारोटी यादरम्यान देखील काँक्रिटीकरण करण्याच्या कामास पावसाळ्यानंतर सुरुवात करण्यात येईल. याव्यतिरिक्त पालघर येथील शंभर खाटांच्या रुग्णालयाचे काम, विरार येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम, ग्रामीण रुग्णालय खानिवडे येथील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थानाचे बांधकाम इत्यादी कामे मंजूर करण्यात आलेली असून नियोजित वैद्यकिय महाविद्यालय इमारतीचे बांधकाम देखील प्रस्तावित आहे. केंद्र शासनाच्या डीएफसी प्रकल्पांतर्गत केंद्र व राज्य सरकार यांच्या ५०% टक्के संयुक्त भागीदारीतून पाच उड्डाणपूलांची कामे प्रगतीपथावर आहेत. रेल्वे फाटक शिलोत्तर, रेल्वे उड्डाणपूल कोळगाव, रेल्वे फाटक वाणगाव, चिखले, घोलवड, बोर्डी इत्यादी कामे पूर्ण झालेली असून सर्व उड्डाणपूल वाहतुकीस खुले करण्यात आलेले आहेत तर उर्वरित पुलांपैकी जुचंद्र, नारिंगी–बोळींज, सफाळे व नवली यांची कामे ७५ टक्के पूर्ण झालेली असून सर्व उड्डाणपूल डिसेंबर २४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असलयाचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. सन २०२४ च्या अर्थसंकल्पात रस्त्यांच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे मंजूर झालेली असून त्याकरिता १३८.२० कोटी इतका निधी मंजूर झाला असून यामधील ६.८३ कोटी पुलांकरिता मंजूर आहेत. नाबार्ड अंतर्गत विभागाच्या अखत्यारीतील पालघर, डहाणू, तलासरी व वसई या तालुक्यातील सन २०२३ –२४ पासून एकूण १४ पुलांची कामे मंजूर असून १४ कामे प्रगतीपथावर आहेत. सदर पुलांमुळे औद्योगिक शहरांस जोडणे सोयीस्कर झाले आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंतर्गत वडोदरा मुंबई द्रुतगती मार्ग हा दिल्ली मुंबई दृतगती मार्गाचा प्रकल्प सद्यस्थितीला प्रगतीपथावर असून हा प्रकल्प साधारणत: जुलै २०२५ पर्यंत पूर्ण झाल्यानंतर या भागातील शेतमालाची व औद्योगिक उत्पादनांची सुलभपणे ने–आण करण्यासाठी याचा खूप फायदा होणार आहे. उद्या दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आलेले असून या जनता दरबारामध्ये जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी तसेच सर्व शासकीय विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित राहणार असून नागरिकांनी आपल्या समस्या व प्रश्न मांडण्यासाठी नियोजित ठिकाणी उपस्थित रहावे व आपल्या समस्यांचे निवारण करून घ्यावे असे आवाहनही पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी यावेळी केले.

## वसई–विरार महानगरपालिका मुख्यालय ...

समस्या आल्यास महापालिका कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन आयुक्त पवार यांनी यावेळी केले. तसेच शासन निर्देशानुसार आयुष्मान आरोग्य मंदिर व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्याच्या दिलेल्या उद्दिष्टानुसार आज ८ आयुष्यमान आरोग्य मंदिर व ३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाचे लोकार्पणही महापालिका वैद्यकीय आरोग्य विभाग व प्रभाग समिती कार्यालयांतर्गत तेथील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्या–त्या ठिकाणी करण्यात आले. तसेच राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामांचे प्रशिक्षण, त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली आहे. प्रशिक्षणार्थ्यांना १२वी पास असल्यास ६ हजार रु., आयटीआय/पदविका असल्यास ८ हजार रु. आणि पदवीधर/पदव्युत्तर यांना १० हजार रु. प्रतिमाह विद्यावेतन दिले जाणार आहे. वसई विरार शहर महापालिकेमार्फत सदर सेवा उपलब्ध करण्यात आली असून आतापर्यंत १७० युवकांनी यात सहभाग नोंदविला आहे. जास्तीत जास्त युवकांनी यात सहभाग नोंदवून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त पवार यांनी यावेळी युवक वर्गाला केले. यावेळी महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर चिमाजी अप्पा यांच्या तैलचित्रांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर वसई विरार शहर महापालिका पत्रकार कक्षाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा गुणवत्ता कार्यक्रम (NCAP) अंतर्गत महापालिकेला ५७ ई–बसेस प्राप्त होत असून त्यापैकी आज १० ई–बसेसचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महापालिका मुख्यालयात झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमास आ. हितेंद्र ठाकूर, आ. क्षितीज ठाकूर, मा. महापौर राजीव पाटील, माजी सभापती, माजी नगरसेवक व नगरसेविका, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पोलीस विभागातील कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी, पत्रकार, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते.

## पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या जनता ...

उपस्थित होते. जनता दरबारामध्ये नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून ३४० नागरिकांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १२८ अर्ज निकाली काढण्यात आले. तर ११२ अर्ज प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी स्वतः नागरिकांच्या समस्या आणि प्रश्न जाणून घेऊन त्यांचे अर्ज निकाली काढण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# जिल्हा रत्न पुरस्कार हा कौतुकास्पद उपक्रम, हा पायंडा सुरु रहावा -रवींद्र चव्हाण



**पालघर/प्रतिनिधी**

मागील वर्षीपासून सुरू करण्यात आलेला पालघर जिल्हा रत्न पुरस्कार हा कौतुकास्पद उपक्रम असून हा उपक्रम कायम सुरू रहावा, असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री पालघर, रवींद्र चव्हाण यांनी केले आहे. आज दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी बिरसा मुंडा सभागृह जिल्हा परिषद पालघर येथे रवींद्र चव्हाण सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत पालघर रत्न पुरस्कार व सरळ सेवा भरती प्रक्रियेतील उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रधान कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम हे सर्वांना सोबत घेऊन काम करतात तसेच त्यांचे सहकारी हे जिल्हा परिषदेमध्ये सातत्याने काहीतरी वेगळा उपक्रम राबवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात, असे सांगून आज वेगवेगळ्या क्षेत्रांमधील प्रत्येकाला इथे पुरस्कार दिला असून सगळ्यांनी त्यांच्या जीवनामध्ये जे केलेले काम असेल ते काम इतरांनी पाहून त्यातून आदर्श घ्यावा की या त्या दिशेने मला कसं जाता येईल आणि मी उद्याचा त्या पुरस्काराचा मानकरी कसा होईल, जेणेकरून त्याच्यामधून एक वेगळ्या पद्धतीचं काम जिल्ह्यात उभ राहिल, अशा भावना यावेळी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केल्या. यावेळी आयुर्वेदामधील पुरस्काराबद्दल बोलताना या कार्याची माहिती जिल्हाभरात पोचली पाहिजे असे मतदेखील त्यांनी व्यक्त केले. यावेळी पालघर जिल्हा रत्न पुरस्काराने भावनादेवी भगवान सांबरे-पालघर जिल्हा महिला रत्न पुरस्कार, प्रसाद सावे कृषिरत्न पुरस्कार, बाबू किसन दखणे आयुर्वेद रत्न पुरस्कार, सुभाष नवसु गावित रेशीम रत्न पुरस्कार, मधुकर रामभाऊ वाढू आदिवासी रत्न पुरस्कार, बाबू चांगदेव मोरे जनजागृती रत्न पुरस्कार, नरेंद्र भास्कर पाटील पत्रकार रत्न पुरस्कार, रामचंद्र दिगंबर जाधव-आदिवासी कलारत्न पुरस्कार, पवन जयस्वाल शौर्यरत्न पुरस्कार यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद पालघर मुख्यालय परिसरात सोलार कार पोर्टचे भुमीपुजन करण्यात आले. त्याचप्रमाणे पंचायत समिती विक्रमगड इमारती दुरुस्ती करणे जव्हार येथे व्यापारी संकुल बांधणे ता. जव्हार पालघर येथे व्यापारी संकुल बांधणे ता. पालघरमोखाडा येथे व्यापारी संकुल बांधणे ता. मोखाडामोखाडा येथील पंचायत समिती इमारत लोकार्पण सोहळाप्राथमिक आरोग्य केंद्र सुत्रकार लोकार्पण सोहळा ता. तलासरी, उपकेंद्र घिमानिया येथील लोकार्पण सोहळा ता. तलासरी यांचे आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले.ग्रामपंचायत नंडोरे- देवखोप, खडकोली-वसरे व चहाडे यांना आयएसओ ९००१:२०१५ नामांकन दर्जा प्राप्त प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सरळ सेवा भरती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या विस्तार अधिकारी (संखिकी), कनिष्ठ सहाय्यक (लेखा), वरिष्ठ सहाय्यक (लेखा), आरोय परिवेक्षक, शिक्षक उर्दू (माध्यम) या पदांवर नवनियुक्त पात्र उमेदवारांना नियुक्तीपत्र पालक मंत्री महोदय यांच्या हस्ते देण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी जिल्हा परिषदेच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित राहून पालकमंत्री नेहमीच प्रोत्साहन देतात त्याबद्दल पालकमंत्र्यांचे आभार व्यक्त केले. खासदार हेमंत सवरा यांनी पुरस्कार प्राप्त गुणवंतांना शुभेच्छा दिल्या. कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. या कार्यक्रमास माजी खासदार राजेंद्र गावित, पालघर विधानसभा आमदार श्रीनिवास वनगा, बांधकाम समिती सभापती संदेश ढोणे, उपाध्यक्ष पंकज कोरे, सभापती रोहिणी शेलार, सभापती संदीप पावडे, सभापती मनीषा निमकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, पुरस्कार प्राप्त गुणवंतांचे कुटुंबीय, जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी वर्ग, पत्रकार, जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित होते.

# कल्याण महावितरणमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**कल्याण/प्रतिनिधी**



महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभाग, कल्याण आणि भांडुप परिमंडल कार्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक सुनिल काकडे यांच्या हस्ते प्रादेशिक विभाग कार्यालयात ध्वजवंदन करण्यात आले. तर कल्याण परिमंडल कार्यालयात मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा आणि भांडुप परिमंडल कार्यालयात अधीक्षक अभियंता सुनिल यादव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तर कल्याण व भांडुप परिमंडल कार्यालयांतर्गत विविध गावांत स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित ग्रामसभांमध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची व्यापक जनजागृती करण्यात आली. घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारुन मोफत वीज उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश मुख्य कार्यालयाकडून देण्यात आले होते. त्यानुसार कल्याण एक व दोन, वसई, पालघर, ठाणे, वाशी, पेण या मंडल कार्यालयांतर्गत विविध गावांमध्ये आयोजित ग्रामसभांमध्ये या योजनेची माहिती देण्यात आली. महावितरणच्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. ध्वजवंदनाच्या कार्यक्रमाला महाव्यवस्थापक अनिल बराटे, उप महाव्यवस्थापक योगेश खैरनार, अधीक्षक अभियंते निलकमल चौधरी, कैलास दुधबर्वे, दीपक पाटील, दिलीप भोळे, मोहन काळोखे, महेश अंचिनमाने, सहायक महाव्यवस्थापक हविशा जगताप, धैर्यशील गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र बागुल, कार्यकारी अभियंते कौमुदी परदेशी, प्रवीणकुमार थोरात, प्रवीण काळे, मिलींद चौधरी यांच्यासह अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

# तरुणीच्या विनयभंगाप्रकरणी सफाळे बंदला व्यापाऱ्यांचा प्रतिसाद




**पालघर/प्रतिनिधी**

एका तरुणीच्या विनयभंगाप्रकरणी सफाळ्यात मंगळवार १३ ऑगस्ट रोजी सर्वपक्षीय बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला येथील व्यापाऱ्यांनी तसेच अन्य दुकानदारांनी १० ते ५ या वेळेत आपली दुकाने (अत्यावश्यक सेवा वगळून) बंद करुन प्रतिसाद दिला. स्थानिक पोलीस आणि रेल्वे पोलिसांनी अत्यंत कडेकोट बंदोबस्त ठेवल्याने कोणताच अनुचित प्रकार न घडता बंद शांततेत पार पडला. गुरुवार ०१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सफाळे स्थानकाजवळील पार्किंगमध्ये एका तरुणीची छेड काढण्यात आली होती. याप्रकरणी पालघर लोहमार्ग पोलिसांनी तिघांना अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली होती. मात्र त्यानंतर येथील सर्व पक्षाचे पदाधिकारी, स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन आणि अन्य संघटनांनी रविवार ११ ऑगस्ट रोजी एक बैठक बोलावून या घटेबाबत गंभीर चर्चा केली. दरम्यान, सकारात्मक चर्चा झाल्यानंतर सर्वपक्षीयांनी एकत्रित येवून तमाम भगिनींच्या संरक्षणाबाबत येथील जनतेमध्ये एकजूट आहे, ही आम जनतेची भूमिका सर्व परिसरामध्ये जाहीर व्हावी, तसेच अशी घटना पुन्हा होऊ नये, यासाठी मंगळवारी बंदची हाक पुकारली होती. या बंदला व्यापारी तसेच अन्य दुकानदारांनी प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली होती. यात शाळा, कॉलेज, शासकीय कार्यालये, दूध डेअरी, मेडिकल शॉप आदि अत्यावश्यक सोयी सुविधा सुरु ठेवण्यात आल्या होत्या. तर सफाळे पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे आणि पालघर लोहमार्ग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन इंगवले यांनी सकाळपासूनच बाजारपेठ आणि स्थानकात कडेकोट बंदोबस्त ठेवल्याने परिसराला छावणीचे स्वरूप आले होते. सफाळे पंचक्रोशीत साधारण ५० ते ६० गाव पाडे असून नागरिकांना जीवनावश्यक आणि अन्य वस्तूच्या खरेदीसाठी सफाळे बाजारपेठ हे एकमेव ठिकाण आहे. या बंदबाबत अनेकांना माहिती नसल्याने खरेदीसाठी आलेल्या गोरगरीब नागरिकांना आल्या पाऊली परतावे लागले. अशातच प्रवासी रिक्षा वाहतूकही मोजकीच सुरु असल्याने काहिंना त्याचा फटका बसला.

# प्राध्यापकांनी एकजुटीने आंदोलनात सहभागी व्हावे -डॉ.ताप्ती मुखोपाध्याय

**वसई/प्रतिनिधी**

आजच्या शिक्षणव्यवस्थेतील ढिसाळ कारभाराविरूद्ध आवाज उठविण्यासाठी प्राध्यापकांनी एकजुटीने आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन एमफुक्टोच्या माजी अध्यक्षा तसेच बॉम्बे युनिव्हर्सिटी आणि कॉलेज टीचर्स युनियन अर्थात बुक्टु संघटनेच्या मार्गदर्शक डॉ.ताप्ती मुखोपाध्याय यांनी केले. त्या अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई येथे बुक्टु संघटनेतर्फे बुधवार दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित प्राध्यापक संघटनेच्या पालघर जिल्हास्तरीय मेळाव्यात बोलत होत्या. यावेळी उपस्थित असलेल्या बुक्टु संघटनेच्या माजी महासचिव डॉ. मधु परांजपे यांनी बुक्टु संघटनेने वेळोवेळी केलेल्या आंदोलनांचा आढावा घेत मार्गदर्शन केले. मुंबई विद्यापीठ, अधिसभा सदस्य प्रा. शांती पोलामुरी यांनी मुंबई विद्यापीठ अधिसभेत मांडलेल्या प्राध्यापकांच्या समस्यांबाबत विस्तृत विवेचन केले. तसेच बुक्टू संघटनेचे अध्यक्ष डॉ. गुलाबराव राजे सरांनी उपस्थितांना



आवाहन केले की, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघ व मुंबई विद्यापीठ महाविद्यालय व प्राध्यापक संघटनेच्या वतीने (बुक्टू) प्राध्यापकांच्या विविध न्याय्य मागण्यासाठी टप्प्याटप्प्याने रचनात्मक आंदोलन उभे केले आहे. येत्या १६ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट परिसरात तसेच २३ ऑगस्ट २०२४ रोजी बांद्रा रेल्वे स्टेशन ते बीकेसी कामगार आयुक्तालय याठिकाणी होणाऱ्या सभेत व मोर्चात महाराष्ट्रभरातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि शासनाला आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी दबावगट उभा करून आंदोलन यशस्वी करावे. सदर मेळाव्याचे प्रास्ताविक करताना बुक्टुचे संयुक्त सचिव प्रा.पी. एम. पगारे यांनी मेळाव्याचा उद्देश स्पष्ट केला. ह्या मेळाव्यास वर्तक महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. दीपा मुर्डेश्वर-कत्रे यांच्याबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालघर परिसरातील अनेक प्राध्यापकही उपस्थित होते. सदर मेळाव्याचे सूत्रसंचालन मुंबई विद्यापीठ, अधिसभा सदस्य डॉ. सखाराम डाखोरे यांनी केले तर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिलकुमार शेळके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# १७वा युवा आमदार दहीहंडी उत्सव; पालघर जिल्ह्यातील गोविंदांना नाव नोंदविण्याचे आवाहन

**विरार/प्रतिनिधी**



बहुजन विकास आघाडी पुरस्कृत व श्रीकृष्ण जन्मोत्सव मंडळ आयोजित १७वा युवा आमदार दहीहंडी उत्सव मंगळवार, २७ ऑगस्ट रोजी साजरा होत आहे. विरार-मनवेलपाडा येथे आयोजित या उत्सवाची सुरुवात सकाळी ११ वाजता भगवान श्रीकृष्ण यांची प्रतिमा व दहीहंडीचे पूजन करून करण्यात येईल. या उत्सवात सहभागी होऊ इच्छित असलेल्या महिला व पुरुष गोविंदांना दुपारी २ ते रात्री १० या वेळात सलामीकरता निमंत्रित करण्यात आलेले आहे. उत्सवात सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी अनिवार्य असल्याने गोविंदा पथकांना माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत यांचे विरार-मनवेलपाडा येथील कार्यालयात २५ ऑगस्टपर्यंत नाव नोंदणी करता येणार आहे. पथक व नाव नोंदणीकरता गोविंदा पथकाचे अध्यक्ष, पथक प्रमुख तसेच सर्वात वरच्या थरावरील १४ वर्षे वय पूर्ण बालगोविंदाच्या स्थानिक वास्तव्याचा पुरावा असलेले आधार कार्ड, गोविंदांच्या विमा प्रमाणपत्राची छायांकित प्रत आणि पथकास समाविष्ट सर्व गोविंदांच्या नावांची यादी सोबत आणावी, असे आवाहन आयोजक माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत व बहुजन विकास आघाडीचे संघटक-सचिव अजीव पाटील यांनी केले आहे. विशेष म्हणजे; हा उत्सव पालघर जिल्ह्यातील गोविंदा पथकांसाठी मर्यादित असणार असल्याचेही त्यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी ९९२३७०९१९१ या नंबरवर संपर्क साधता येईल.

# राखी पौर्णिमे निमित्त वाडा बाजर फुलला



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा बाजारपेठ ही तालुक्यातील मोठी व खरेदीसाठी सोईस्कर असल्याने तालुक्यातील खेड्या, पाड्यातील नागरिकांचा सणासुदीच्या खरेदीसाठी वाड्याकडे जास्त कल असल्याचे दिसून येत आहे. सोमवारी (दि.१९ ऑगस्ट) राखी पौर्णिमा असल्याने राखी खरेदीसाठी महिलांनी दुकानांमध्ये गर्दी केली आहे. राखी पौर्णिमेच्या निमित्ताने बाजारातील दुकाने रंगी बेरंगी व चमचमत्या रख्यानी सजली आहेत. बाजारात कमीत कमी एक राखी पाच रुपयाला तर जास्तीतजास्त दोनशे रुपयांपर्यंत एक राखी आहे तर काही राख्या दहा रुपये डझन ते पन्नास रुपये डझन पर्यंतच्या राख्या उपलब्ध आहेत. रुद्राक्ष, मेटॅलिक, डायमंड नेकलेस, धागा, गोंडा ब्रेसलेट अशा विविध राख्यांची दुकाने सजली आहेत. बच्चे कंपनीसाठी छोटा भिम, टॉम अँड जेरीच्या आकर्षक राख्यांनी मुलांना आकर्षित केले आहे. मागील वर्षीपेक्षा या वर्षी राख्यांचे दर १० टक्क्यांनी वाढले असल्याची माहिती येथील विक्रेत्याने दिली.

# वाडा सरपंच परिषदेचा नाशिकच्या आंदोलकर्त्यांना पाठिंबा



**वाडा/प्रतिनिधी**

नाशिक येथील गोल्प क्लब मैदान येथे पेसा अंतर्गत १७ संवर्गात तात्काळ भरती करून नियुक्ती पत्र मिळावे या साठी आमरण उपोषणाला बसलेल्या विद्यार्थ्यांना आणि आंदोलनकर्त्यांना वाडा सरपंच परिषदने जाहीर पाठिंबा दिला आहे. साक्षी साठे (सरपंच अबिटघर तथा जिल्हा समन्वयक सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य) यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने रवींद्र जोगवला यांच्या नेतृत्वाखाली नाशिक येथे सुरू असलेल्या उपोषणाला बसलेल्या आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी वाडा सरपंच परिषद यांनी आपल्या तालुक्यातील सर्व सरपंचांसह प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना प्रोत्साहित केले. या वेळी वाडा पंचायत समितीच्या माजी सभापती अश्विनी शेळके, सामाजिक कार्यकर्त्या अर्चना भोईर, सरपंच परिषदचे सचिव मंगल राऊत, खजिनदार निलेश कोदे, माजी अध्यक्ष भरत हजारे व सर्व पदाधिकारी आणि सरपंच परिषदेचे सर्व सरपंच सदस्य उपस्थित होते. यावेळी पालघरचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी दुरध्वनी द्वारे संभाषण करून सहकार्य करण्याचे आश्वसन दिले.

# मुरुडमध्ये १ कोटी १९ लाख ७२ हजार रुपयांचा गुटखा जप्त

**लातूर/अमर करकरे**



मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील गुट्टे नगर भागात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा मारून सुमारे १ कोटी १९ लाख ७२ हजार रुपयेचा बेकायदा गुटखा जप्त केला आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे बेकायदा गुटखा माफियांचे धाबे दणादली असून जिल्ह्यातील बेकायदा गुटखा माफीया पोलिसांचा रडावर आले आहेत. या कारवाई दरम्यान पोलिसांनी चार जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत पोलीस सुत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित दिले आहेत . त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत. अवैध धंद्याची माहिती काढत असताना १२ ऑगस्ट २०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे मुरुड हद्दीमध्ये काहीही इसमांनी त्यांच्या फायद्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य गुटखाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी साठवून ठेवलेला आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी व अमलदारांच्या पथकाने दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी मुरुड येथील गुट्टे नगर परिसरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी घरामध्ये दोन ठिकाणी छापा मारला असता तेथे महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेले वेगवेगळ्या कंपनीचे, महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित असलेले गुटका व सुगंधित पानमसाला असा अनुक्रमे ६६ लाख ४० हजार १०१ रुपयाचा व दुसऱ्या ठिकाणी ५३ लाख ३२ हजार २४० असा एकूण ०१ कोटी १९ लाख ७२ हजार ३४१ रुपयांचा एकूण रुपयांचा प्रतिबंधित गुटका व सुगंधित पान मसाला तंबाखू चा मुद्देमाल तसेच वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारा छोटा हत्ती वाहन मिळून आल्याने ते मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. पोलीस ठाणे मुरुड येथे प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या साठवणूक केल्याचे मिळून आलेले आरोपी अनिल वसंत कापसे, राहणार गुट्टे नगर, मुरुड, विशाल गुट्टे, राहणार मुरुड, संदिपान बाबुराव विटेकर, राहणार मुरुड, बाळासाहेब ब्रिजलाल लोहिया, राहणार मुरुड, भैरू नरसू गुट्टे, राहणार गुट्टे नगर मुरुड यांच्यावर अनुक्रमे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे मुरुड पोलीस करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, पोलीस अमलदार विनोद चिलमे, रामहरी भोसले, माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे,मोहन सुरवसे, रियाज सौदागर, तुराब पठाण, राजाभाऊ मस्के, जमीर शेख प्रदीप चोपणे यांनी पार पाडली.

# जिल्हा परिषदेमध्ये स्वातंत्र्य दिनाचा सोहळा

**पालघर/प्रतिनिधी**



आज भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न झाला. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी ध्वजारोहण करून ध्वजाला मानवंदना देण्यात आली. यानंतर राष्ट्रगीताचे आणि राज्यगिताचे गायन करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, उपाध्यक्ष तथा शिक्षण वित्त समिती सभापती पंकज कोरे, समाज कल्याण समिती सभापती मनीषा निमकर, बांधकाम वित्त समिती सभापती संदेश ढोणे, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती संदीप पावडे, महीला व बालकल्याण समिती सभापती रोहिणी शेलार अति. मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे तसेच जिल्हा परिषद सदस्य सर्व विभाग प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्ष प्रकाश निकम तसेच सर्व मान्यवरांनी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना भेटून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.




### ७८वा भारतीय स्वातंत्र दिनानिमित्त पालघर मुख्य शासकिय ध्वजारोहण संपन्न

# शासनाच्या महत्वकांक्षी योजनेच्या माध्यमातून पालघर जिल्हा प्रगतिशील जिल्हा म्हणून ओळख निर्माण करेल -रविंद्र चव्हाण

**पालघर/प्रतिनिधी**

शासनाच्या महत्त्वकांक्षी योजनेच्या माध्यमातून आज पालघर जिल्ह्यातील एकूण होत असलेल्या विकास कामांच्या व विविध प्रकल्पांच्या संदर्भात विचार करता आगामी काळामध्ये आपला पालघर जिल्हा राज्यात एक प्रगतिशील जिल्हा म्हणून ओळख निर्माण करेल असा विश्वास सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. भारतीय स्वातंत्राच्या ७८वा मुख्य शासकिय ध्वजारोहन पालकमंत्री रव्रिंद्रं चव्हाण यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी रवींद्र चव्हाण मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ हेमंत सवरा, आमदार श्रीनिवास वनगा, माजी खासदार राजेंद्र गावित, जिल्हाधिकारी



गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, मुद्रांक जिल्हाधिकारी दिपक पाटील, तहसिलदार सचिन भालेराव तसेच वरीष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, महाविद्यालयीन व शालेय विद्यर्थी व नागरीक उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस पालघर जिल्ह्यामध्ये प्रचंड प्रतिसाद मिळाला असून तीन लाखापेक्षा अधिक भगिनींनी या योजनेसाठी अर्ज सादर केला आहे. पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये आधार कार्ड बँकेशी संलग्न असलेल्या भगिनींच्या खात्यामध्ये जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्याची ३ हजार रुपये इतकी रक्कम जमा होण्यास सुरवात झाली आहे. महसूल विभागामार्फत दिनांक १ ऑगस्ट पासून 'महसूल पंधरवडा २०२४' साजरा करण्यात ...पान ६ वर

# वसई-विरार महानगरपालिका मुख्यालय आणि प्रभाग समिती कार्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



### आ. क्षितीज ठाकूरांच्या हस्ते पत्रकार कक्षाचे उद्घाटन

**विरार/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय तसेच पालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महापालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांमार्फत राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीताचे गायन करण्यात आले तसेच प्रतिज्ञा घेण्यात आली. स्वातंत्र्य दिनानिमित्त केलेल्या आपल्या भाषणात आयुक्त पवार यांनी सर्व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, राज्य शासनाने सुरु केलेल्या महत्त्वाकांक्षी योजना महापालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहेत. राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण सक्षम दरमहा रु. १५०० इतकी रक्कम दिली जाईल. महापालिकेकडून या योजनेचे १ लाख १४ हजारांपेक्षा जास्त लाभार्थी महिलांचे अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने भरून घेण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ लाभार्थींच्या दिलेल्या बँक खात्यात जमा होण्यासाठी बँक खाते हे आधार सीडिंग असणे आवश्यक आहे. परंतु बऱ्याचशा लाभार्थ्यांचे बँक खाते आधार सीडिंग नसल्याने त्यांना लाभ देण्यास अडचणी येत आहेत. अशा सर्व पात्र महिलांनी लवकरात लवकर त्यांचे बँक खाते आधार सीडिंग करून घ्यावे. याबाबत कोणतीही ...पान ६ वर

# पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या जनता दरबारामध्ये १२८ अर्ज निकाली



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय येथे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबारामध्ये १२८ अर्ज निकाली काढण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे सकाळी १०:३० वाजता जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ. हेमंत सवरा, माजी खासदार राजेंद्र गावित, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व सर्व विभागातील विभाग प्रमुख आणि नागरिक ...पान ६ वर

# पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील पोषण आहारात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार-पालकमंत्री

**पालघर/प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत आश्रमशाळांमधील ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पोषण आहारातून विषबाधा झाल्याची दुर्घटना घडली होती, असे प्रकार बंद करण्यासाठी आश्रमशाळांमधील पोषण आहारात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

कांबळगाव येथील आश्रम शाळेच्या परिसरात असलेल्या मध्यवर्ती स्वयंपाक गृहाला पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. पाहणी दौऱ्यावेळी पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम खासदार डॉ. हेमंत सवरा आदी मान्यवर उपस्थित होते. पोषण आहाराबाबत इतरही काही तक्रारी निर्माण



झाल्या होत्या. जिल्हा प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी या घटनेची अद्यावत माहिती जाणून घेतली असे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. पोषण आहार बनवत असताना यासाठी असणाऱ्या आदर्श पद्धती (sop) चे पालन केले जात नसल्याचे प्रथम दर्शनी लक्षात आले असून या सर्व बाबींची नियमित देखरेख करणे गरजेचे आहे.याबाबत जिल्हाधिकारी गोविंद बोडके आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहे. २० ऑगस्टला याप्रकरणी विस्तृत अहवाल सादर करण्यात येणार असून कोणी हेतुपुरस्सर असे गैरप्रकार करत असेल, तर त्यावर कठोर कारवाई केली जाईल असे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी आश्रमशाळेतील पोषण आहार व्यवस्थेची पाहणी केली. विद्यार्थी आणि शिक्षकांसोबत चर्चा करून त्यांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेतल्या.

# भिवंडीतील पत्रकार रवी शिंदे यांचे निधन



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीतील ज्येष्ठ पत्रकार रवी शिंदे (वय ५२ वर्ष) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन मुली असा परिवार आहे. पत्रकार रवी शिंदे यांनी मागील वीस वर्षांपासून भिवंडीतील अनेक सामाजिक, राजकीय व शैक्षणिक विषयांवर लेखन करून गोरगरीब जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे. त्यांच्या आकस्मित निधनाने शिंदे परिवारावर शोककळा पसरली आहे.

**'क्राईम संध्या' परिवारातर्फे पत्रकार रवी शिंदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!**

# राष्ट्रवादी युवती काँग्रेस उदगीर शहर कार्याध्यक्ष पदी सुनिता तेलंगे यांची निवड



**देवणी/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार प्रदेश अध्यक्ष सुनिल तटकरे राष्ट्रवादी युवती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे यांच्या मान्यतेने क्रिडा युवक कल्याण व बंदरे मंत्री संजय बनसोडे व राष्ट्रवादी महिला काँग्रेस जिल्ह्य कार्याध्यक्षा दिपाली औटे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. सदरील निवड युवती जिल्ह्याध्यक्षा साक्षी कांबळे यांनी केली सदरील निवडीस शिफारस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चित्रपट साहित्य व सांस्कृतिक विभाग लातूर जिल्ह्याध्यक्ष अभिजीत औटे यांच्या शिफारस नुसार करण्यात आली. या निवडीबद्दल आमदार बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी लातूर जिल्ह्याध्यक्ष अफसर शेख कार्याध्यक्ष पंडित धुमाळ प्रदेश सरचिटणीस व्यंकट बेद्रे प्रदेश सरचिटणीस समिर शेख अल्पसंख्यांक विभाग प्रदेश उपाध्यक्ष खाजा तांबोळी जिल्ह्याध्यक्ष शफि हाशमी सामाजीक न्याय जिल्ह्याध्यक्ष प्रदिप जोंधळे उदगीर तालुका अध्यक्ष बालाजी भोसले शहर अध्यक्ष जानी सय्यद वसंत पाटील शशिकांत बनसोडे युवती शहराध्यक्ष काजल मिरजगावे महिला तालुका अध्यक्ष उर्मिला वाघमारे शहर अध्यक्ष मधुमती कनशेट्टे कार्याध्यक्षा वैशाली कांबळे शहर उपाध्यक्ष प्रिती कवठीकवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी आदींनी अभिनंदन केले आहे.

# देवणी तहसील कार्यालयावर शेतकरी संघटनेचा ट्रॅक्टर मोर्चा!

**देवणी/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात देवणी तहसील कार्यालयावर शुक्रवार रोजी शेतकरी संघटना व शेतकपरी बांधवांच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला या रॅलीमध्ये बोरोळ व देवणी परिसरातील सर्व ट्रॅक्टर मालक-चालक व शेतकरी बैलगाडीसह सहभाग घेतला होता. मागिल वर्षीच्या पिक विमा व इतर शेतकऱ्यांच्या मागण्यांच्या संदर्भात ट्रॅक्टर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली देवणीतील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली. देवणी येथील बोरोळचौक, मुर्गी चौक, पंचायत समिती, मार्गे तहसील कार्यालय येथे रवाना झाली या दरम्यान देवणी -निलंगा -उदगीर मुख्य रस्त्याकडे जाणारी वाहतुक वाहतुकीसाठी कोणतीही अडचन नकरता पोलिस प्रशासनाच्या वतीने बंदोबस्त ठेवण्यात आला होता तहसील कार्यालय येथे शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले की, देवणी तालुक्यातील पंचनामे करूनही क्लेम मंजूर असुनही विमा न मिळालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर कृषी विमा नुकसान भरपाई मिळावी व वन्य प्राण्यांपासून शेतीचे होणारे नुकसान थाबण्संयसाठी वन्य प्राणी संरक्षण कायदा



रद्द करुन सर्व शेतकऱ्यांना १००% टक्के अनुदानांवर तारकुंपन देण्यात यावे, शेतीसाठी शेतकऱ्यांना दिवसा बारा तास उच्च दाबाने लाईट उपलब्ध करून देण्यात यावे, ग्रामीण बँका, सहकारी बँक या बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांच्या बँक खाते होल्ड करून सक्तीची कर्ज वसुली करीत आहेत, तरी संबंधीत अधिकाऱ्यांवर बँक संघटीत गुन्हेगारीचा गुन्हे दाखल करण्यात यावे व सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देण्यात यावी, स्वामीनाथन आयोग लागु करावा, दुधातील होणारी भेसळ रोखुन गायीच्या दुधाला डिझेलचा भाव तर म्हशीच्या दुधाला पेट्रोलचा भाव देण्यात यावा, सोयाबीन पिकांच्या या वर्षी कमी दर मिळाला. या फरकाच्या रक्कमेला सातबाऱ्यावरील पिकपेऱ्याची अट रद्द करावी व सरसकट सर्व शेतकऱ्यांना हि मदत जाहीर करावी व ऊसाला पाच हजार रूपये दर द्यावा व दोन साखर कारखांन्यामधील हवाई अंतराची अट रद्द करण्यात यावी, आदी मागण्याचे निवेदन देण्यात आले. या वेळी शेतकरी संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आनंद जीवणे व युवा आघाडी उपाध्यक्ष सत्यदेव लक्ष्मण गरड कार्याध्यक्ष कालिदास आपेट, शेतकरी संघटना उपाध्यक्ष सुरेंद्र अंबुलगे, युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष मिथुन दिवे ज्येष्ठ शेतकरी नेते अमर मुर्के, श्रीमंत अण्णा लुले, योगेश तगडखेडे, करीम भाई शेख, चेतन मिटकरी, संतोष जीवने, उमाकांत जीवने, मल्लिकार्जुन ईश्वरसेटे, श्रीकांत धनुरे यांच्यासह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.